cmyk

## संपादकीय

### विकृती वेळीच ठेचावी लागेल

देशात 'इंडियन गॉट लेटेंट' नावाचा तथाकथित कॉमेडी शोमध्ये अत्यंत खालच्या दर्जाचे संभाषण, खुलेआम शिवीगाळ चालत असते. शोमध्ये भाग घेणाऱ्यांत तरुण मुले-मुली अधिक असतात. मुलीसुद्धा मुलांच्या बरोबरीने शिवीगाळ करतात. या साऱ्यातून जी खसखस पिकते त्याला विनोद असे म्हटले जाते. खरे तर हा विनोद नव्हे तर पांचटपणाच. काही दिवसांपूर्वी रणवीर अलाहाबादियाच्या यूट्यूबवरून मोठा वाद झाला. बीअर बायसेप्स या यूट्यूब चॅनेलमुळे तो परिचित आहे. आपल्या शोमध्ये त्याने, तुला तुझ्या पालकांना आयुष्यभर सेक्स करताना पाहायला आवडेल की तुला त्यांच्याबरोबर सामील होऊन ते कायमचे थांबवायला आवडेल, असा प्रश्न केला.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com








बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२९६ | मंगळवार, दि.१८ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


# सोयाबीन एक हजाराने पडले!

मुंबई । प्रतिनिधी

**देशातील बाजारात सोयाबीनचा भाव हमीभावापेक्षा किमान एक हजार रुपयाने कमी मिळत आहे. सरकारने खरेदीही बंदी केली. याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना सरसकट भाव फरक द्यावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत. भाव फरक दिला तरच शेतकरी पुढील हंगामात सोयाबीनची लागवड करतील, असेही शेतकऱ्यांनी सांगितले.**



## सरकारने हमीभावातील फरक देण्याची शेतकऱ्यांची मागणी

देशात सरकारने जवळपास २० लाख टन सोयाबीनची खरेदी हमीभावाने केली. त्यापैकी सर्वाधिक खरेदी महाराष्ट्रात झाली. महाराष्ट्राने जवळपास ११ लाख २१ हजार टनांची खरेदी केली. तर मध्य प्रदेशातही ७ लाख १९ हजार टनांच्या दरम्यान खरेदी झाली. मात्र यंदा आंतरराष्ट्रीय बाजारात सोयाबीनच्या भावात मंदी आहे. ब्राझील, अमेरिका, अर्जेंटीना आणि चीनमध्ये उत्पादन वाढले आहे. त्यामुळे जागतिक बाजारात पुरवठा वाढला. याचा परिणाम जागतिक बाजारावर दिसत आहे. याचा फटका आपल्या शेतकऱ्यांना बसत आहे. देशात यंदा गेल्या १५ वर्षातील कमी भाव मिळत आहे. गेल्या ४ वर्षापासून भाव सतत कमी होत आहेत. सध्या बाजारात सोयाबीन ३ हजार ७०० ते ४ हजारांच्या दरम्यान भाव मिळत आहे. हा भाव हमीभावापेक्षा किमान एक हजाराने कमी आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. या दरातून उत्पादन खर्चही भरून निघत नाही. यामुळे पुढील हंगामात पान २ वर

# मनोज जरांगे रागावून बोलले, ते आमचे दैवत

## आ.सुरेश धस २० फेब्रुवारीला कृषी विभागातील घोटाळ्यावर बोलणार

बीड । प्रतिनिधी



**शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे इंटरनॅशनल स्पीकर आहेत. इंटरनॅशनल स्पीकरवर बोलण्याची माझी लायकी नाही असा टोला भाजप आमदार सुरेश धस यांनी संजय राऊतांना लगावला. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि कृषी विभागातील घोटाळ्यासंदर्भात मी २० तारखेला बोलणार आहे. मनोज जरांगे पाटील आमचे दैवत आहे. ते माझ्यावर रागावून बोलले, त्यामुळे मी त्यांच्यावर काही बोलणार नाही असेही धस म्हणाले. बीड तालुक्यातील श्री क्षेत्र नारायण गड जमिनी संदर्भात सुरेश धस यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.**

बीड तालुक्यातील श्री क्षेत्र नारायण गड जमिनी संदर्भात सुरेश धस यांनी सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी ते म्हणाले, परिसरातील गाळ उपसा संदर्भात पान २ वर

# जीबीएसचा धोका वाढला तर राज्यातील यात्रांवर निर्बंध

## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिले संकेत; कोविड काळाची आठवण

बुलढाणा । प्रतिनिधी

**जीबीएस हा आजार जर संसर्गजन्य असल्याचे समोर आले तर राज्यातील यात्रांवर निर्बंध आणण्यात येतील असे केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी म्हटले आहे. त्यामुळे कोविड काळातील भयावह परिस्थिती सर्वांच्या डोळ्यासमोर उभी राहीली आहे.**

राज्यात सध्या जीबीएस हा आजार डोके वर काढत असून २०० पेक्षा जास्त रुग्ण आहेत. त्यामुळे सर्वत्र चिंतेचे वातावरण आहे. त्यातच केंद्रीय आरोग्य राज्य मंत्र्यांनी तर हा आजार संसर्गजन्य असल्यावर यात्रांवर निर्बंध घालण्याचे संकेत दिले आहेत. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, जीबीएस हा आजार जर गर्दीमुळे होत पान २ वर






### गुइलेन बॅरे सिंड्रोम नेमका काय?

दिल्लीतील जीटीबी रुग्णालयातील औषध विभागाच्या डॉक्टरांच्या मते, हा एक न्यूरोलॉजिकल आजार आहे. या आजाराची लक्षणे स्वाइन फ्लूसारखीच आहेत. ज्यामध्ये सर्दी, खोकला आणि जास्त ताप येतो. या आजाराचे नेमके कारण अद्याप कळलेले नाही. गुइलेन-बॅरे सिंड्रोम हा एक दुर्मिळ पण गंभीर आजार आहे ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती स्वतःच्या नसांवर हल्ला करते. यामुळे अशक्तपणा, सुन्नपणा किंवा अर्धांगवायू होऊ शकतो.

## कोंबड्यांचं मासं खाल्ल्याने जीबीएसची लागण?

### धोका टाळण्यासाठी अजित पवारांचे जनतेला कोणते आवाहन?

**मुंबई: राज्यात सध्या जीबीएसची नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या आजाराचा धोका टाळण्यासाठी जनतेला आवाहन केले आहे. ते म्हणाले, अर्धवट शिजलेले अन्न किंवा कोंबडीचे मांस खाऊ नये असे ते म्हणाले. त्यामुळे कोंबडीचे मांस खाणाऱ्यांनी या आजाराची धास्ती घेतली आहे.**

महाराष्ट्रात जीबीएसचा कहर सतत वाढतांना दिसत आहे. आरोग्य विभागाच्या मते, एकूण रुग्णांपैकी १८० रुग्णांना जीबीएसची लागण झाली आहे. या आजारामुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ लागले आहे. रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील नागरिकांना सावधगिरी



बाळगण्याचे आणि अर्धवट शिजवलेले अन्न किंवा कोंबडीचे मांस खाऊ नये, असे आवाहन केले आहे. पुण्यात पान २ वर

# सार्वजनिक शिवजयंती उत्सवात सहभागी व्हा

## आ.संदीप क्षीरसागरांचे बीडकरांना आवाहन

बीड । प्रतिनिधी

**दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर (चंपावती नगरी) च्या माध्यमातून आगळ्यावेगळ्या स्वरूपात शिवजयंती साजरी करण्यासाठी आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांनी याहीवर्षी शिवजयंती साजरी होणार आहे. शिवजयंती सोहळ्यास सर्व बीडकर बंधू-भगिनिंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.**


गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे बीड शहरात आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून आणि मार्गदर्शनातून



भव्य दिव्य आणि आगळ्यावेगळ्या स्वरूपात शिवजयंती साजरी केली जात आहे. वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य आणि क्रीडा कार्यक्रमांच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे शिवजयंती साजरी होत आली आहे. दरवर्षी प्रमाणे बीडच्या सांस्कृतिक परंपरेनुसार सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर (चंपावती नगरी) च्या माध्यमातून दि.१९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ७:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शासकीय महापूजा आणि सायंकाळी ६:०० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. सर्व बीडकरांनी या शिवजयंती पान २ वर

# ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उत्पादने विक्री करण्यास इफ्कोने याआधीच घातली बंदी

## अंजली दमानिया यांनी नॅनो खतांच्या ऑनलाईन खरेदीवरून केलेले खोटे आरोप आणि वस्तुस्थिती



मुंबई । प्रतिनिधी

**जागतिक स्तरावर सर्वात मोठी खतांची सहकारी संस्था इफ्कोने याआधीच लेखी स्वरूपात स्पष्ट केलेले आहे की कोणत्याही ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मला इफ्कोची उत्पादने विकण्याचा अधिकार नाही.**

अनधिकृत ऑनलाईन प्लॅटफॉर्म वरून खरेदी करण्यात येणारी इफ्कोची उत्पादने ही संपूर्णतः खरेदीदारांच्या जबाबदारीवर आहेत. सदर प्लॅटफॉर्म गैरवाजवी किंमतीत ही उत्पादने अनधिकृतरित्या विकतात. ऑनलाईन खतविक्री बाबतच्या केंद्र सरकारच्या नियमानुसार '' एफ सी ओ '' परवाना किंवा इफ्को कडून अनिवार्य असलेला 'ओ फॉर्म' नसलेल्या कोणत्याही संस्थेस उत्पादने विक्री करण्यास मनाई घातलेली असून असे केल्यास त्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार इफ्कोने राखून ठेवलेला आहे. याबाबत इफ्कोने वेळोवेळी प्रेस नोट काढून माध्यमांना देखील पान २ वर

## धनंजय मुंडे काहीही करू शकतात

### अंजली दमानिया यांचा खळबळजनक आरोप

**मुंबई** : घरापर्यंत आलेली ऑर्डर धनंजय मुंडेंच्या दबावामुळे परत गेल्याचे कंपनीकडून सांगण्यात आल्याचा आरोप दमानियांनी केला आहे. त्यामुळे धनंजय मुंडेही काहीही करू शकतात असा आरोप अंजली दमानिया यांनी केला आहे. यापूर्वी देखील अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मंत्री मुंडे यांच्यावर खळबळजनक आरोप केला आहे. अंजली दमानिया यांनी नॅनो युरिया आणि नॅनो डीएपीसाठी ऑनलाईन ऑर्डर केली होती. मात्र, धनंजय मुंडेंच्या दबावामुळे ऑनलाईन कंपनीनं ऑर्डर थांबवल्याचा आरोप दमानिया यांनी केला आहे. तसेच पुन्हा एकदा अंजली दमानिया धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी पान २ वर

# लिंकवर क्लिक करताच अडीच लाख गायब

## सायबर विभागाच्या सतर्कतेमुळे पाटोद्यातील व्यक्तीला रक्कम परत मिळाली



बीड । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील माऊलीनगर येथे राहणाऱ्या एका व्यक्तीच्या मोबाईवर एक लिंक आली. त्या व्यक्तीने त्यावर क्लिक करताच एसबीआय बँक खात्यातील २ लाख ६० हजार रुपये गायब झाले. त्यानंतर संबंधीत व्यक्तीने बीडच्या सायबर विभागात तक्रार करताच तपासाची चक्रे फिरवल्याने पान २ वर

# मस्साजोगकरांचे अल्टीमेटम;..तर २५ फेब्रुवारीला मंत्रालयावर धडक

बीड । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्येला जवळपास ७० दिवस झाले आहे. न्याय नाही मिळाला तर आर पारची लढाई लढू, अशी टोकाची भूमिका मस्साजोगच्या गावकऱ्यांनी घेतली आहे. आरोपी कृष्णा आंधळे याला अटक करण्यासाठी २५ फेब्रुवारीपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे. जर मागण्या पूर्ण झाल्या नाही तर मस्साजोगकर थेट मंत्रालयावर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्येला जवळपास ७० दिवस होत आले आहे. अद्याप सरकारने कोणतीही ठोस भूमिका घेतलेली दिसत नाही. त्यामुळे आता पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ फेब्रुवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५३.५० क्विंटल | २,९२२ | ३,३०० | ३,१६५ |
| ज्वारी/हायब्रिड: ८८.५० क्विंटल | १,८०० | ३,३४० | २,४२५ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ५३.०० क्विंटल | ६,९०० | ७,४३१ | ७,३०८ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| बाजरी: १०.५० क्विंटल | २,२०१ | २,९०१ | २,५५८ |
| मुग : ०.५० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| सोयाबीन: १२२.५० क्विंटल | ३,८२५ | ४,१०० | ४,००५ |
| हरभरा: २९.५० क्विंटल | ५,५०० | ९,००१ | ७,०३३ |

# शेतकऱ्यांना जमीनीचा वाढीव मावेजा न दिल्याने बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांची धावती गाडी जप्त

## माजलगाव न्यायालयाचा महत्वपुर्ण निर्णय; चिखलबीड सिंचन प्रकल्प प्रकरण




### आदेशानंतर पैसे दिले नाहीत

कोर्टाने अनेक वेळा शेतकऱ्यांना मोबदला देण्याचे आदेश दिले. त्यानंतरही शेतकऱ्यांना मोबदला दिली नाही, यामुळे कोर्टाने सर्व प्रकार समजून घेत जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दिले. त्यानंतर जिल्हाधिकारींची धावती गाडी जप्त करण्यात आली. माजलगाव कोर्टाने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या वाहनाच्या जप्तीच्या आदेश काढल्यानंतर जिल्हाभरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान बीडच्या जिल्हाधिकारी कचेरी कार्यालयातून ही गाडी जप्त करण्यात आली आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांना चपराक

बीड जिल्हाधिकाऱ्यांना कोर्टाने चपराक बसली आहे. आठ दिवसांपूर्वी अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्री म्हणून पहिली बैठक घेतली होती. त्यानंतर सोमवारी जिल्हाधिकारींची गाडी जप्त करुन बीड कोर्टात आणण्यात आली. आता न्यायालय काही दिवस हे पैसे जमा होण्याची वाट पाहणार आहे. त्यानंतर पैसे भरले नाही तर जिल्हाधिकाऱ्यांच्या गाडीचा लिलाव करण्याचे आदेश न्यायालय देऊ शकतील, असे वकिलांनी सांगितले. दरम्यान, गाडी जप्त केल्यानंतर गाडीवर अंबर दिवा झाकण्यात आला आहे.

बीड । प्रतिनिधी

**कोर्टाने अनेक वेळा शेतकऱ्यांना मोबदला देण्याचे आदेश दिले. त्यानंतरही शेतकऱ्यांना मोबदला दिली नाही, यामुळे कोर्टाने सर्व प्रकार समजून घेत जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दिले. त्यानंतर जिल्हाधिकारींची धावती गाडी जप्त करण्यात आली. याबाबत माजलगाव न्यायलयाने जप्तीचे आदेश दिले होते.**

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील चिखल बीड येथे १९९८ मध्ये लघु सिंचन प्रकल्प उभारण्यात आला होता. या प्रकल्पासाठी तीन शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या होत्या. त्या शेतकऱ्यांना तुटपुंजा मोबदला दिला होता. पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# विकृती वेळीच ठेचावी लागेल

देशात 'इंडियन गॉट लेटेंट' नावाचा तथाकथित कॉमेडी शोमध्ये अत्यंत खालच्या दर्जाचे संभाषण, खुलेआम शिवीगाळ चालत असते. शोमध्ये भाग घेणाऱ्यांत तरुण मुले-मुली अधिक असतात. मुलीसुद्धा मुलांच्या बरोबरीने शिवीगाळ करतात. या साऱ्यातून जी खसखस पिकते त्याला विनोद असे म्हटले जाते. खरे तर हा विनोद नव्हे तर पांचटपणाच. काही दिवसांपूर्वी रणवीर अलाहाबादियाच्या यूट्यूबवरून मोठा वाद झाला. बीअर बायसेप्स या यूट्यूब चॅनेलमुळे तो परिचित आहे. आपल्या शोमध्ये त्याने, तुला तुझ्या पालकांना आयुष्यभर सेक्स करताना पाहायला आवडेल की तुला त्यांच्याबरोबर सामील होऊन ते कायमचे थांबवायला आवडेल, असा प्रश्न केला. त्याच्या या वादग्रस्त प्रश्नावरून मोठा गहजब झाला. आता त्याच्याविरुद्ध गुन्हाही नोंदवण्यात आला आहे. विनोदाच्या नावाखाली त्याच्या शोमधून पांचटपणा आणि हीन दर्जाचे जोक्स केले जातात. असा हा कचरा शो देशातील कोट्यवधी लोक पाहतात म्हणे.

यूट्यूबवर हा शो इतका लोकप्रिय आहे की, त्याचे महिन्याचे उत्पन्न दोन कोटी रुपये तसेच त्याचे दीड कोटी फॉलोअर्स आहेत म्हणे. हा शो पाहणाऱ्यांपैकी बरेचजण प्रयागराजला जाऊन डुबकी मारून आले असतील. अनेकजण अयोध्येला नव्या राम मंदिरात जाऊन आले असतील. अनेकजण पंतप्रधान मोदी व भाजपचे समर्थक असतील. मोठ्यांचा आदर केला पाहिजे, आपली जुनी संस्कृती जपली पाहिजे असेही त्यांना वाटले असेल. या साऱ्यांनी रणवीरच्या शोमधील हीन अभिरुचीचा धिक्कार केला पाहिजे. रणवीरचा गतवर्षी नरेंद्र मोदींनी दिल्लीत गौरव केला होता. रणवीर श्रोत्यांना संभोगाकडून समाधीकडे नेत आहे काय असा प्रश्न पडतो. आदिम काळात माणसे एकमेकांचा विचार नर-मादी असा करत असतीलही पण आपण तेथून उत्क्रांत होऊन आजच्या स्थितीला आलो आहोत. मानवी समाजात आपण नाती मानतो. त्यांचा आदर करतो. आई-वडील, गुरू, बहीण यांचे नाते पवित्र मानले जाते. सभ्य व सुसंस्कृतपणाची ती एक खूण आहे. काही वेळा या संस्कृतीतील नाती जाचक होऊ शकतात आणि त्याविरुद्ध बंडही होऊ शकते.

१९६० च्या दशकात हिप्पी समाज निर्माण झाला तो याच बंडातून. हिप्पी म्हणजे अनिर्बंध लैंगिक संबंध, उघड्यावर बेबंद वागणे, व्यसन करणे. हिप्पी संस्कृतीतून नवे संगीत, कला व वेगळा विचार जन्माला घालण्याचा प्रयत्न झाला होता. रणवीर आणि त्याचे साथीदार जे बोलत वा वागत आहेत ते अत्यंत हिणकस आहे. त्यामागे कोणताही बंडाचा विचार नाही. ही सारी बड्या बापाची कार्टी आहेत. अधिकाधिक पैसा व प्रसिद्धी मिळवणे हेच त्यांचे ध्येय आहे. 'इंडियाज गॉट लेटेंट' हा विनोदवीर समय रैनाचा शो आहे. त्यात बोलताना रणवीर अलाहाबादियाने अश्लील शब्दांचा वापर केला. त्याने ज्या विषयावरच्या चर्चेला तोंड फोडले त्यात मर्यादा व भान ठेवणे आवश्यक होते. ज्या गोष्टी करायला अथवा बोलायला नको त्यांची जाहीर वाच्यता करण्याचा आगाऊपणा रणवीरने केला. त्यानंतर प्रांत आणि स्तर याबाबतचा कोणताही विचार न करता लोक रणवीरवर तुटून पडले हे चांगले झाले. राजकीय मतभेद असणाऱ्यांनाही त्याच्या विरोधात भूमिका घ्यावी लागली आणि व्यक्त व्हावे लागले. भारतीय समाजात अथवा सभ्य समाजात काही मर्यादा पाळाव्या लागतात. त्यासाठी जगावेगळे असे काही करावे लागत नाही. मात्र, जे विषय वर्ज्य आहेत त्यावर बोलणे टाळावे लागते. कुटुंबात काही गोष्टी अशा असतात ज्यावर बोलायचे नसते शिवाय बाहेरसुद्धा काय बोलायचे, कशावर आणि कुठपर्यंत बोलायचे याचे एक सूत्र असते. त्याबाबतची कोणतीही नियमावली नाही मात्र संकेत आहेत, ते पाळावे लागतात. कुटुंबात वडिलधाऱ्यांसमोर, कनिष्ठांसमोर काय बोलायचे याचे भान ठेवावे लागते. विनोदाचे अथवा कॉमेडीचे थोडेसे वेगळे आहे. लोकांना हसवणे कठीण असते. विनोदाला कोणताही विषय वर्ज्य नाही, म्हणूनच 'टवाळा आवडे विनोद' असे म्हटले जाते. असे असले तरी विनोद करताना तारतम्य हे बाळगायलाच हवे. नाहीतर अर्थाचा अनर्थ होऊ शकतो. सध्या युवकांच्या विचाराचा स्तर पाहता आपण आधुनिकतेच्या नावाखाली नीतिमूल्यांनाच तिलांजली देत आहोत काय असा प्रश्न पडतो. आपल्या आई-वडिलांबाबत बोलताना किंचितही लाज वाटू नये एवढी ही पिढी निर्ढावली कशी? पूर्वी मोजकी माध्यमे होती. त्यांना नैतिक आणि सामाजिक धाक होता. त्यावर वयाने व अनुभवाने ज्येष्ठ असलेली मंडळी छाननीसाठी उपलब्ध होती. आज माध्यमांचा भडिमार झाला आहे. त्यांचा स्वच्छंदी वापर सुरू आहे. स्टँडअप कॉमेडी, इंटरनेट मीडिया अथवा ओटीटी अशा माध्यमातून अश्लीलतेचा अनिर्बंध आणि भयमुक्त प्रसार सुरू आहे. काय बोलायचे, काय करायचे आणि काय दाखवायचे याबाबत कसलेच बंधन राहिलेले नाही. त्यामुळे रणवीर, समय रैना यासारख्यांची पैदास होतच राहणार.

## थोडक्यात....

### सुरक्षेत कपात केल्याने शिवसेना आमदार नाराज

मुंबई : सुरक्षामध्ये कपात केल्या कारणाने शिवसेना शिंदेंचे आमदार नाराज असल्याची चर्चा आहे. शिवसेना आमदारांची वाय दर्जाची सुरक्षा काढल्याने आमदार नाराज असल्याचे बोलले जात आहे. शिवसेनेच्या अनेक आमदारांसोबत आता फक्त एकच बॉडीगार्ड राहणार असून मंत्र्यांचे वाय प्लस दर्जाची सुरक्षा तशीच राहणार आहे.

### कर्जतमध्ये महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन

कर्जत: कर्जतमध्ये २६ मार्चला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा होणार असून महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेकडून स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. २६ ते ३० मार्चदरम्यान कुस्ती स्पर्धा होणार असल्याची माहिती आमदार रोहित पवारांची दिली.

### सुप्रिया सुळे आज बीड दौऱ्यावर

बीड-सुप्रिया सुळे दि. १८ फेब्रुवारी रोजी मस्साजोग दौऱ्यावर जाणार आहेत. या दाऱ्यादरम्यान त्या धनंजय देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेणार आहेत. त्यानंतर त्या परळीत जाऊन महादेव मुंडे यांच्या कुटुंबाचीही भेट घेणार आहेत. हेलिकॉप्टरने सुप्रिया सुळे मस्साजोगमध्ये जाणार आहेत.

### शरद पवार ॲक्शन मोडवर

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी शरद पवार ॲक्शन मोडवर असल्याचे चित्र आहे. पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थित २८ फेब्रुवारी रोजी पक्षाच्या आमदार, खासदार आणि पदाधिकाऱ्यांची मुंबईत बैठक होणार आहे. आता आगामी निवडणुकीसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष सज्ज झाला असल्याचे दिसते.

# हस्तीमल बंब यांना सपत्निक राज्यस्तरीय जैन रत्न पुरस्कार

**जालना । प्रतिनिधी**

सकल जैन समाज नांदेड जिल्हा तर्फे उल्लेखनीय कार्य करणार्या मान्यवरांचा राज्य स्तरीय सत्कार समारोह पुरस्कार प्रदान कार्यक्रम दि. १६ फरवरी २०२५ रविवार रोजी नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन नियोजन भवन सभागृहात अत्ति उत्साहात पार पडला. या भव्य समारोहाचे उद्घाटन जैन अल्पसंख्यक महाराष्ट्र राज्य महामंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) असलेले मा. श्री ललित गांधी यांच्या शुभहस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष पद जैन सेवा संघाचे अध्यक्ष आनंद जैन यांनी भुषविले. यात प्रथम पुरस्कार जैन रत्न, द्वितीय जैन भुषण आणि तृतीय विशेष कार्य करणारे मान्यवराना श्री गांधी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला राज्याच्या अनेक जिल्ह्यातुन व नांदेड



जिल्ह्यातील बंधु-भगिनी, युवक-युवती व सामाजिक कार्यकर्ताची मोठी उपस्थिती होती. प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जैन रत्न हा श्री हस्तीमल बंब यांना सह-पत्नीक प्रदान करण्यात आले. सत्काराचा उत्तर देताना बंब म्हणाले मागील ४० वर्षापासून जैन संघटनाच्या माध्यमाने सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना प्रारंभी जालना शहर अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, मराठवाडा विभागीय अध्यक्ष, दोन वेळा महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पदाचा मान मला लाभलेला आहे. परराज्यात राजस्थान, आंध्रप्रदेश च्या प्रभारी अध्यक्ष म्हणून गावा-गावात तळा-गळा पर्यंत संघटना बळकट केलेली आहे. उत्कृष्ठ जिल्हाध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्याचा प्रथम पुरस्कार, मराठवाडा भुषण पुरस्कार, उत्कृष्ठ राज्य अध्यक्ष म्हणून सन्मान, व्यापारी समाजात कार्य करीत असताना जिल्ह्यातील विशेष करून ग्रामीण भागातील लहान-सहान १० हजार व्यापार्यांना प्रत्येकी १ लाख रुपयाचा अपघाती विमा निःशुलक देणारा फक्त महाराष्ट्रातच नाही संपुर्ण देशात एकमेव जालना जिल्हा आहे म्हणून मी व्यापारी मित्र पुरस्काराचा मानकरी ठरलो. भारतीय जनता पार्टीचे उद्योग व्यापारी आघाडीचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष म्हणून व्यापार्यांची अनेक समस्या सोडविण्याचे कार्य केले आहे. कमी वयात सुन-मुली, विधवा, घटस्फोटीत, अपंग-विकलांग असे दिनदुःखी उमेद्वारांचे पुर्नःविवाह साठी सम्मेलन घेणे, गरजुवंतास मदत करणे असे अनेक सेवाभावी कार्य केलेले आहे. आजचा हा दिलेला पुरस्कार मला प्रोत्साहन व उत्साह देणारा आहे. सदर पुरस्काराचे उपकार ऋण या पुढे समाजासाठी, गरजुंसाठी अधिक काम करून परत फेड करीन. अंतिम श्वासापर्यंत समाजासाठी, व्यापार्यांसाठी, गरजवंत लोकांसाठी काम करीत राहीन असे बंब म्हणाले. श्री ललित गांधी यांनी श्री बंब यांना व्यापारी मतदार संघात, विधान परिषद किंवा राज्यसभेत पाठविला पाहिजे, समाजासाठी, व्यापार्यांसाठी व गरजु लोकांच्या हितात त्यांचा मोठा योगदान आहे असे उद्गार व्यक्त केले व बंब यांना शुभेच्छा दिल्या. राज्यातून अनेक प्रतिष्ठीत मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार सचिव ऋषिकेश कोंडेकर यांनी केले.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर उपाध्यक्षपदी प्रताप लहाने



जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील चंदनझिरा येथील रहिवासी असलेले प्रताप लहाणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते आज दि. १७ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश केला. श्री लहाने यांनी राष्ट्रवादीत प्रवेश करताच जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जालना शहर उपाध्यक्षपदी नियुक्ती केली. या नियुक्ती बद्दल श्री लहाणे यांचे सर्वांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी अभिषेक देशमुख, धर्मेद्र जांगडे ,आप्पासाहेब डनगळ, बाळाभाऊ देशमुख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# मंठा नगरपंचायत उपनगराध्यक्ष पदी छायाताई वाघमारे

मंठा । प्रतिनिधी

मंठा नगरपंचायतच्या उपनगराध्यक्ष पदी सौ.छाया अरुण वाघमारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली . नगरपंचायत मंठा सभागृहामध्ये पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी परतुर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित नगरपंचायत सदस्यांमधून उपनगर अध्यक्ष पदाच्या निवडणुकी मध्ये नगरपंचायतचे मुख्याधिकारी दीपक इंगोले , प्रशासकीय अधिकारी मुजजमिल अन्सारी यांच्या सहाय्याने सौ छाया अरुण वाघमारे यांची बिनविरोध नगर उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी आमदार बबनराव लोणीकरांनी शुभेच्छा देऊन मंठा शहरातील आगामी विकास कामात निधीची कमतरता पडू देणार नाही असे सांगितले, मंठा शहराच्या इतिहासात तब्बल २९ वर्षानंतर अनुसूचित जातीला मिळालेले हे पद असून यापूर्वी मंठा ग्रामपंचायत मध्ये पंडितराव गुणाजी वाघमारे यांची



१९९६ दरम्यान सरपंच पदी निवड झाली होती. त्या पाठोपाठ सौ छाया अरुण वाघमारे यांची २९ वर्षानंतर ही निवड झाल्याने एका सर्वसामन्य तळागाळातील व्यक्तीची काळजी करणारा , सर्वसामन्य कार्यकर्त्यप्रती संकट समयी धावून जाणाऱ्या कार्यकर्त्याला आमदार लोणीकरांच्या माध्यमातून खरा न्याय मिळाला असल्याची जनभवना आज नागरिकातून व्यक्त झाली. यावेळी नगराध्यक्ष सौ.वंदनाताई वैजनाथ बोराडे, नगरसेवक जे. के. कुरेशी, नगरसेवक नितीन राठोड, नगरसेवक नारायण दवणे, नगरसेवक दीपक बोराडे, नगरसेवक अचितराव बोराडे, नगरसेवक राजेश खंदारे, नगरसेवक प्रल्हादराव बोराडे, यांच्यासह सदस्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती .

# आरोग्यास घातक असलेल्या सुगंधी तंबाखुच्या गोदामावर छापा

**जालना । प्रतिनिधी**

आज जालना शहरातील नविन मोंढा भागात काही दुकानदार हे आरोग्यास घातक असलेला सुगंधी तंबाकुचा साठा करुन विक्री करत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्यावरुन डि.वाय.एस.पी. चौधरी यांनी वरिष्ठांच्या सुचना प्रमाणे पोलीस स्टेशन चंदनझिराचे टिम तयार करुन नविन मोढा भागात खेरुडकर ट्रेडर्स, रॉयल ट्रेडर्स व मोहन एजेन्सी या दुकानावर शासकीय पंचा सह छापा मारुन मानवी आरोग्यास घातक असलेला व शासनाने प्रतिबंधीत केलेल्या वेग वेगळ्या कंपनी व ब्रान्डच्या सुगंधीत तंबाखु पान मसाला वाहतुक करणारे वाहण असे एकूण ५ लाख ६१,०००/- इतक्या रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी अन्न व औषध विभाग जालना यांना पत्र व्यवहार करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बन्सल , उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांचे मागदर्शनाखाली प्रो.डि.वाय.एस.पी. करिश्मा चौधरी मॅडम, पोउपनि सचिन सानप पोउपनि एम. बी स्कॉट, सहा. पोउपनि मनसुब वेताळ, हुसेन अफसर, पोहेको कृष्णा तंगे, संतोष वनवे, गजानन जारवाल, रवि देशमुख, अभिजीत वायकोस, कडुबा सोनुने, नवनाथ पाटील, चालक परमेश्वर हिवाळे, गौतम बोबडे यांनी सदरची कारवाई केली आहे.

## पान १वरून...

### सोयाबीन एक

शेतकरी सोयाबीन लागवड कमी करण्याची भीती निर्माण झाली आहे.

सरकारने यंदा शेतकऱ्यांना हमीभावाने सोयाबीन खरेदीचे आश्वासन दिले होते. त्यामुळे शेतकरी सरकारला सोयाबीन देण्यासाठी तीन महीने थांबले. मात्र सरकारच्या खरेदीतील गोंधळ कायम राहीला. सरकारने देशभरात ३३ लाख ८५ हजार टन खरेदीचे उद्दीष्ट ठेवले होते. मात्र प्रत्यक्ष खरेदी केवळ २० लाख टनांच्या दरम्यान झाली आहे. म्हणजेच सरकारने एकूण उद्दीष्टाच्या ६० टक्केच खरेदी केली. उरलेले सोयाबीन शेतकऱ्यांना खुल्या बाजारात विकावे लागले आहे. महाराष्ट्रात १४ लाख १३ हजार टन खरेदीचे उद्दीष्ट ठेवले होते. मात्र खरेदी केवळ ११ लाख २१ हजार टन झाली. नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी २ लाख ५३ हजार शेतकरी आजही सोयाबीन खरेदीची वाट पाहत आहेत. तसेच इतर शेतकरी बाजारभाव वाढण्याची वाट पाहता आहेत. मात्र दरात नरमाई आली. याचा फटका आपल्या शेतकऱ्यांना बसत आहे. त्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना सरसकट बाजारभाव आणि हमीभावामधील फरक द्यावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत. सरकारने भाव फरक दिल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळेल आणि शेतकरी पुढच्या हंगामात सोयाबीन लावतील, अन्यथा शेतकरी पुढच्या हंगामात सोयाबीन लावणार नाहीत, अशी भीती शेतकरी आणि उद्योगांनीही व्यक्त केली.

--------------

### मनोज जरांगे रागावून

जिल्हाधिकाऱ्यांसोबत चर्चा झाल्याची माहिती धसांनी दिली. यासह मतदारसंघातील विविध प्रश्नां संदर्भात बैठक घेतली. जिल्हाधिकारी लवकरात लवकर त्या संदर्भातील प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवणार आहेत असे धस म्हणाले. मी २० तारखेला सर्व प्रश्नांवर बोलणार आहे. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि कृषी संदर्भात मी २० तारखेला बोलणार आहे असे धस म्हणाले. सरकारने गाळ काढण्याचे धोरण सुरु केले आहे. आमच्या भागातील देखील काही प्रकल्पातील गाळ काढायचा आहे. त्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा झाल्याचे सुरेश धस म्हणाले. दरम्यान, सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतल्यानंतच त्यांच्यावर विरोधकांनी जोरदार टीका केली होती. आता यावर धस काय बोलणार याकडे देखील सर्वाचे लक्ष लागले आहे.

------------------------

### जीबीएसचा धोका वाढला

असल्याचे किंवा संसर्गजन्य असल्याची माहिती मिळाली तर वैद्यकीय अधिकारी आणि प्रशासनाची बैठक घेऊन लवकरच राज्यातील यात्रांवर निर्बंध आणण्यात येईल. तसेच बुलढाणा जिल्ह्यातील सर्वात मोठी असलेल्या सैलानी यात्रेवरही निर्बंध आणण्याबाबत विचार सुरू आह, असे ते म्हणाले.

----------

### कोंबड्यांचं मासं खाल्ल्यान

कोंबड्यांच्या मांसामुळे जीबीएस पसरल्याची चर्चा असताना जीबीएसचा धोका टाळण्यासाठी अन्न पूर्णपणे शिजवा, असे आवाहन अजित पवार यांनी राज्यातील नागरिकांना केले आहे.

--------------

### धनंजय मुंडे काहीही करू शकतात

आक्रमक झाल्या आहेत. घरापर्यंत आलेली ऑर्डर धनंजय मुंडेंच्या दबावामुळे परत गेल्याचे कंपनीकडून सांगण्यात आल्याचा आरोप दमानियांनी केला आहे. त्यामुळे धनंजय मुंडेही काहीही करू शकतात असा आरोप अंजली दमानिया यांनी केला आहे. यापूर्वी देखील अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मुख्यमंत्र्यांनी लवकरात लवकर धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्यावा अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे. मंत्री ठरवणार का राजीनामा द्यायचा की नाही? असा संतप्त सवाल अंजली दमानिया यांनी उपस्थित केला आहे.

--------------

### ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उत्पादने विक्री करण्यास

माहिती दिलेली आहे. इफ्को कंपनीच्या सर्व उत्पादनांची विक्री किंमत ही संपूर्ण देशात सारखीच आहे. मात्र काही कमर्शिअल ई - कॉमर्स प्लॅटफॉर्म या खतांच्या दहा - पाच बाटल्या कुठूनतरी उपलब्ध करून त्या ऑनलाईन ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अधिकचे डिस्काउंट देऊन विक्रीस ठेवतात. अशी माहिती समोर आल्यानंतर इफ्कोने संबंधितांना नोटिसा सुद्धा दिलेल्या आहेत. अंजली दमानिया यांनी आज सांगितलेल्या ॲग्री बीग्री या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मला इफ्कोची उत्पादने विकण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे वादात येण्यापेक्षा संबंधित कंपनीने सदर उत्पादनांची ऑनलाईन विक्री बंद केली असावी. कुठल्या एखाद्या व्यक्तीच्या सांगण्यावरून अशी विक्री बंद होत नसते, ही साधी गोष्ट अंजली दमानिया यांना समजायला हवी. मात्र त्या जाणीवपूर्वक या ऑनलाईन खरेदीच्या नावाने आवई उठवून धनंजय मुंडे यांना टार्गेट करत आहेत. मुळात ॲग्री बिग्री या प्लॅटफॉर्म वरून दमानिया यांनी ऑनलाईन ऑर्डर केल्याच्या कितीतरी आधी इफ्कोने सदरील बंदी घातलेली आहे. त्यामुळे दमानिया यांनी वस्तुस्थितीची संपूर्ण व योग्य माहिती पडताळून व्यक्त व्हायला हवे. मात्र बीड घटनेमध्ये एन्ट्री केल्यापासून अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या वर सातत्याने ऐकीव व अर्धवट माहितीच्या आधारे खोटेनाटे आरोप करून सनसनी निर्माण करण्याचा सपाटा लावलेला आहे. राख वाहतूक व ऑफिस ऑफ प्रॉफिट, कृषी खात्यातील खरेदी प्रक्रिया ते अगदी अटक असलेल्या तीन आरोपींचे मृतदेह आढळले, असे अनेक धादांत खोटे आरोप याआधीही अंजली दमानिया यांनी केले असून, या संदर्भात आढळलेली, विषयांना संबंधित असलेली व नसलेली अर्धवट कागदपत्रं त्या ' पुरावे ' म्हणून पुढे करत जनतेची आणि माध्यमांची दिशाभूल करत आल्या आहेत.

-----------

### सार्वजनिक शिवजयंती

उत्सव सोहळ्यात सहभागी होऊन भव्य दिव्य शिवजन्मोत्सव सोहळ्याचे साक्षीदार व्हा. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

ही आहेत सांस्कृतिक कार्यक्रमाची प्रमुख आकर्षणे

- तब्बल ४५० ढोलताशांचे 'करवीर नाद' नावाचे सुप्रसिद्ध असलेल्या ढोलताशा पथकाचे सादरीकरण
- 'तिबेटियन माँक' अर्थात तिबेट देशातील धर्मगुरूंचे जगप्रसिद्ध असलेले 'शाओलीन मार्शल आर्ट'
- पश्चिम बंगाल येथील 'रायबिशी आर्ट स्कूल' नावाचे पथक ॲक्रोबाईक्स आणि वेगवेगळे चित्त थरारक प्रात्यक्षिके सादर करणार.
- ओडिशा राज्यातील 'दुलदुली बाजा' नावाचे आदिवासी वाद्य पथक आपली कला सादर करणार.
- आंतरराष्ट्रीय दर्जाचा लाईट आणि लेजर शो.

महिला, वृध्द आणि बालकांसाठी असणार विशेष बैठक व्यवस्था

दरम्यान या कार्यक्रमामध्ये महिला, लहान मुले आणि वृद्धांसाठी विशेष बैठक व्यवस्था असणार आहे. जेणेकरून महिला भगिनींनाही कार्यक्रमाचा आनंद घेता यावा. तसेच कार्यक्रमस्थळी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आल्याचेही समितीकडून सांगण्यात आले आहे.

--------------

### मस्साजोगकरांचे अल्टीमेटम;..तर

आपल्या गावच्या सरपंच अण्णाच्या न्यायासाठी मसाजोगच्या गावकऱ्यांची टोकाची भूमिका घेतली आहे. प्रशासनावर विश्वास नाही आपण सर्वजण मिळून राज्यपालाची भेट घेऊ तसेच मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यावर विश्वास राहिला नाही, अशी देखील चर्चा यावेळी झाली.

**गावकऱ्यांचा अन्नत्यादाचा इशारा**

आजच्या बैठकीत सर्व गावकऱ्यांनी अन्नत्याग आंदोलन करण्या संदर्भांत चर्चा झाली. आंदोलनावर गावकऱ्यांचे एकमत झाले आहे. न्याय मिळेपर्यंत अन्नत्याग आंदोलन करायचे, यावर गावकऱ्यांनी हात वर करून अनुमोदन दिले आहे. ग्रामस्थांनी अगोदर एक दिवसाचा लाक्षणिक उपोषण करणार आहे. प्रशासन आलं तर त्यांना सांगू मंत्रालयावर जाऊन सर्व गावकऱ्यांनी आत्मदहन करायचं. थेट मंत्रालयावर आंदोलन करण्याची गावकऱ्याच्या बैठकीत चर्चा झाली. २५ फेब्रुवारीपर्यंत प्रशासनाला अल्टिमेटम त्यानंतर अन्नत्याग आंदोलन करण्यावर गावकरी ठाम असून पुढील आंदोलनाची दिशा ठरली.

**आता आर पारची लढाई लढणार**

गृहमंत्र्यांना एक निवेदन तयार करू त्यावरती गृहमंत्री काय उत्तर देतात त्यावर वाट पाहूआठ दिवसाची मुदत त्यांना देऊ आणि त्यानंतर आपलं आंदोलन करू. गृह मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद नाही दिला तर तीव्र आंदोलन करू. त्याचबरोबर राज्यपालांना ही निवेदन जन संदर्भात चर्चा झाली आवादा कंपनीची भूमिका अद्याप पर्यंत समोर आलेली नाही ती भूमिका देखील समोर आली पाहिजे. खंडणी प्रकरणात त्यांनी पण पुरावे प्रशासनाला दिले पाहिजेत. गृहमंत्री मुख्यमंत्री कोणीही असो आम्ही मागे सरकणार नाही, असे गावकरी म्हणाले.

-------------

### लिंकवर क्लिक करताच

बँक खात्यातून चोरलेले सर्व पैसे परत मिळवण्यात सायबर विभागाला यश आले. पाटोदा येथील माऊलीनगर येथील सत्यवान मधुकर रोंढे यांनी स्वत:च्या मोबाईलवर आलेल्या शेअर करो लाईट या ॲपवर एक लिंक आली. त्यावर क्लिक करताच त्यांच्या एसबीआय बँक खात्यातील २ लाख ६० हजार २३ रुपये गायब झाले. त्याचा त्यांना बँकेकडून संदेश आल्यावर रोंढे यांनी बीड सायबर विभागाकडे धाव घेतली. त्यानंतर पोलिस अधिक्षक नवणीत काँवत, अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गात, पोलिस निरीक्षक घोडके, पो.उपनि कासले, पो.हे. बप्पासाहेब दराडे, विजय घोडके, अनिल डोंगरे, पंचम वडमारे, गणेश घोलप, रामदास गिरी, पो.ना. श्रीकांत बारगजे, दत्तात्रय मस्के, पो. अं. प्रदिपकुमार वायभट, अजय जाधव, अमोल दरेकर, निलेश उगलमुगले, महिला पोलिस अंमलदार खरात, शिंदे, औसरमल, चादर, गवते, काशिद यांनी ही कामगिरी केली.

------------

### शेतकऱ्यांना जमीनीचा वाढीव मावेजा

त्यामुळे शेतकऱ्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. १९९८ पासून संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा अद्याप मिळालाच नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना ३२ लाखांची भरपाई देण्याचे आदेश माजलगाव न्यायालयाने दिले. त्यानंतर शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाही. नऊ वर्षांपासून पैसे मिळत नसल्याने शेतकरी हातबल झाले होते. शेतकऱ्यांनी अखेर कोर्टात धाव घेतली. कोर्टाने शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला.

------------

## धुनकवाडची मिरा गव्हाणे कर सहाय्यक एनटीबीमधून महाराष्ट्रात दुसरी

वडवणी । प्रतिनिधी



धुनकवाडची मिरा प्रभाकर गव्हाणे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेत कर साहाय्यक म्हणून उत्तीर्ण झाली असुन एनटी बी मधुन महाराष्ट्रात दुसरा क्रमांक मिळवला आहे.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिरा गव्हाणे ह्या विद्यार्थीनीने आपल्या मेहनतीने कष्टाने हे यश संपादन केले असुन आपल्या आई वडिलांसह कुटुंबाचे व आपल्या गावाचे नावलौकिक केले आहे.धुनकवाड गावाच्या गौरवशाली इतिहासात आणखी एक मानाचा तुरा मिळवला आहे.मिरा गव्हाणे ही धुनकवाड येथील पहिली एमपीएससी परिक्षेत उत्तुंग भरारी घेणारी ही मुलगी आहे.

कु.मिरा गव्हाणे ही गेल्या सहा महिन्यांपूर्वी वनविभागात रायगड जिल्ह्यातील वनक्षेत्र महाड येथील वनपरिमंडळ बिरवाडी येथे दहिवाड बिटला वनरक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे.ही नोकरी करत असताना एवढ्यावरच न थांबता ती एमपीएससीचा ती अभ्यास करत होती या आधीही अनेक परिक्षा देऊन आपल्याला या पेक्षा मोठ्या पदावर जायचं हे स्वप्न उराशी बाळगून मेहनत घेऊन प्रयत्न करत होती आणी अखेर तिच्या या प्रयत्नांना यश आले आहे.कु.मीरा प्रभाकर गव्हाणे हिची मार्फत घेण्यात आलेल्या (कर साहाय्यक) या परिक्षेत मधुन महाराष्ट्र रँक २ आणि महसूल सहाय्यक या दोन्ही पदावर उत्तीर्ण झाली असुन ही निवड झाल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.धुनकवाडचे युवा सरपंच भागवत गव्हाणे यांची ती लहान बहीण आहे.

# स्त्रीही क्षणाची पत्नी व अनंत काळाची माता आहे - श्रीमती संध्या टेकाळे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या अंतर्गत तक्रार निवारण (महिला) समितीच्या वतीने दि. १३ फेब्रुवारी २०२५, गुरुवार रोजी कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण-'महिला सुरक्षितता' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून प्र. प्राचार्य सोमनाथ घाडगे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या आणि सहशिक्षिका श्रीमती सुरेखा खेडकर, सहशिक्षिका श्रीमती संध्या टेकाळे ह्या होत्या. तर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक हे व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यशाळेच्या समन्वयक प्रा. ज्योती रकटे यांनी केले. कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण राहण्यासाठी वेळोवेळी महाविद्यालयाच्यावतीने अशा कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते असे त्या म्हणाल्या. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण आणि कायदे या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या आणि सहशिक्षिका श्रीमती सुरेखा खेडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.तर कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात सहशिक्षिका श्रीमती संध्या टेकाळे यांनी




कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण-'महिला सुरक्षितता' या विषयावर मनोगत व्यक्त केले. भारतातील महिलांची सुरक्षितता आता एक प्रमुख समस्या बनली आहे. देशात महिलांवरील गुन्ह्यांचे प्रमाण खूपच वाढले आहे. महिला घराबाहेर पडण्यापूर्वी दोनदा विचार करतात, विशेषतः रात्रीच्या वेळी. दुर्दैवाने, हे आपल्या देशातील दुःखद वास्तव आहे जिथे सतत भीतीचे वातावरण असते. महिलांची सुरक्षितता म्हणजे महिलांना सुरक्षित वातावरण मिळणे, त्यांच्यावर होणाऱ्या हिंसाचाराला आळा घालणे आणि त्यांच्या सक्षमीकरणाकडे लक्ष देणे. महिलांविरुद्ध होणाऱ्या हिंसाचाराला रोखण्यासाठी धोरणे आखणे, महिलांना स्वसंरक्षणाचे तंत्र शिकवणे, महिलांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या, बरोबरीने हक्क आणि दर्जा देणे महिलांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे. त्यासाठी प्रत्येक शाळा, महाविद्यालयात, कामाच्या ठिकाणी महिला कायद्याविषयी जनजागृती होणे, अशा प्रकारच्या कार्यशाळेचे आयोजन करणे हि आजच्या काळाची गरज आहे. जगातील बहुतेक राष्ट्रात समाजिक स्थरावर व कायद्याने स्त्रीला बऱ्याच बाबतीती पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिले आहे. परंतू देशातील व जगातील स्त्रियांवरील अत्याचार होताना प्रिंट आणि इलेक्ट्रोनिक मीडियातून वाचले आणि बघितले की वाटते, कुठल्याही गोष्टी कायदे केल्याने किंवा त्याची कठोर अंमलबजावणी केल्याने उद्देश साध्य होतातच असे नाही. त्यासाठी स्त्रीच्या प्रती पुरुषातील पुरुषी अहंकार जावा लागतो, मानसिकता सकारात्मक असावी लागते. ''स्त्रीही क्षणाची पत्नी व अनंत काळाची माता आहे.'' हे कालातीत सत्य लक्षात ठेऊन ते कृतीत आणले तरच आज स्त्रियांवर सर्वत्र होणारे अत्याचार थांबतील आणि समाजात ती सन्मानाने व ताठ मानेने जगायला शिकेल. स्त्रीने जर का चंडिकेचे रौद्र रुप धारण केले तर ती कुठलेही संकट सहज परतवू शकते. त्यानंतर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक म्हणाले कि, -'महिला सुरक्षितता आणि कायदे'' यावरती आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय सामारोपात बोलत असताना प्र. प्राचार्य सोमनाथ घाडगे म्हणाले कि, 'तुझ्या उतुंग भरारीपुढे, गगनही ठेंगणे भासावे, तुझ्या विशाल पंखाखाली, विश्व हे सारे वसावे' जगाच्या इतिहासात स्त्रीचा दुर्दम्य आशावाद आणि परिस्थितीशी झुंजण्याच्या अजोड बळाच्या जोरावर आज ती सर्व क्षेत्रात आघाडीवरती आहे. प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून स्त्री उभी आहे. आर्थिक स्वातंत्र्य अनुभवायला शिकली आहे. तिच्या गुणांना, मतांना घरात आणि समाजातही किंमत आहे. विविध क्षेत्रे तिने पादक्रांत केली. स्त्रीची सुरक्षितता हा जरी नाजूक मुद्दा असला तरी आत्मविश्वासाने आज ती व्यक्त होत आहे. काही लोकांच्या वाईट मानसिकतेमुळे संपूर्ण समाजाला त्रास सहन करावा लागतो. त्यासाठी प्रत्येकाने मुलांना लहानपणापासूनच महिलांचा सन्मान करण्याचे शिक्षण दिले पाहिजे. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. डॉ लोखंडे बी. बी. यांनी केले. तर आभार सहशिक्षिका श्रीमती रुपाली मंगरुळे यांनी मानले. या कार्यशाळेला बहुसंख्य महिलांनी प्रतिसाद दिला तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, विद्यार्थीनिनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## राजस्थानी प्राथमिक शाळेचे विद्यार्थी स्नेहसंमेलन उत्साहात

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील माहेश्वरी शिक्षण प्रसारक संस्थेचे राजस्थानी प्राथमिक विद्यालयाचे स्नेह संमेलन नुकतेच संपन्न झाले यात शाळेतील छोट्या विद्यार्थ्यांनी अनेकविध नृत्य प्रकार सादर करत आपल्यातील कलागुण सादर केले.



या स्नेह संमेलनाचे उद्घाटन रोटरी क्लबचे सचिव रो.प्रभाकर शेटे यांनी केले संस्थेचे सचिव रामानंद लड्ढा यांचे अध्यक्षस्थानी झालेल्या या स्नेहसंमेलन उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे वेळी प्रमुख म्हणून अतिथी डॉ.सुनंदा काकानी व सुरेखा झंवर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी व्यासपीठावर पालक प्रतिनिधी सह प्रा.कमलकिशोर लड्ढा मुख्याध्यापक चंद्रशेखर तौर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ.सारिका तौर यांनी केले.

शाळेतील विद्यार्थ्यांनी तुळजाभवानी, कालीमाता, छत्रपती शिवाजी महाराज,देशभक्तीपर व सामाजिक आशय असलेले गीतावर अनेक नृत्य आविष्कार सादर केले.सलग तीन तास चाललेल्या या स्नेहसंमेलनास पालक वर्गाने मोठी गर्दी केली होती.

## वाघोरा जि.प.शाळेने फाल्गुन काष्टेचे केले अभिनंदन

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील वाघोरा जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी तथा गावचे सुपुत्र फाल्गुन काष्टे हे एमपीएससी द्वारे मंत्रालयात क्लर्कपदी नियुक्ती करण्यात आली म्हणून त्यांचे दि.१७ फेब्रुवारी सोमवार रोजी शाळेचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपस्थित सर्व शिक्षकांनी मोठ्या उत्साहात अभिनंदन केले.

या कार्यक्रमाची सुरुवात परिपाठ झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांच्या समक्ष शाळेच्या प्रणांगणामध्ये सकाळी दहा वाजता झाली. मोठ्या उत्साहामध्ये अभिनंदन सत्कार करण्यात आला सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती फाल्गुन काष्टे म्हणाले विद्यार्थ्यांनी योग्य वेळी योग्य अभ्यास केला पाहिजे म्हणजे जीवनात यशस्वी होता येईल.मला यश मिळवण्यासाठी जो उशीर झाला तो तुम्हाला होणार नाही.कार्यक्रमाचे अध्यक्ष शरद कुलकर्णी म्हणाले हे आमच्या शाळेचे आदर्श विद्यार्थी होते.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आरुण




बादाडे म्हणाले विद्यार्थ्यांनी यांची प्रेरणा घ्यावी हे उद्गार होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षक केशव बादाडे यांनी केले, वाघोरा गावामध्ये रात्री आठ ते दहा च्या दरम्यान भव्य मिरवणुकीमध्ये त्यांचा स्वागत सत्कार व माता-भगिनींनी ओवाळणी करून शुभाशीर्वाद दिले. कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य केतन बादाडे उपस्थित होते. विद्यार्थी व सर्व उपस्थितचे आभार बबन पोटे सर यांनी मानले.

## मी छत्रपती शिवाजी महाराजांची लेक मला बदनाम करण्याचा प्रयत्न - डॉ.रेशीम पवळ

पाटोदा । प्रतिनिधी

चुंबळी येथील झालेला प्रकार हा राजकीय हेतूने बदनाम करण्याचा प्रयत्न आहे.मी स्वता छत्रपती शिवाजी महाराजांची लेक आहे.जातीवंत मराठा आहे.मी माझ्या राज्याच्या जयंतीला विरोध कसे करेल अशी प्रतिक्रिया चुंबळी गावचे सरपंच डॉ.रेश्मा पवळ यांनी पत्रकार परिषदेत घेऊन सांगितले

सविस्तर वृत्त असे आहे



की

पाटोदा तालुक्यातील चुंबळी गावच्या सरपंचाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीला परवानगीसाठी बाँड मागितल्याची सोशल मीडिया वर बदनामी कारक व्हिडिओ व्हायरल होत आहे.

परंतु मी स्वता मराठा असून गेल्या अनेक वर्षांपासून सरपंच या नात्याने गावासोबत मोठ्या उत्साहात जयंती साजरी करीत असते.जयंत्तीला व मिरवणुकीला पोलीस खात्याची परवानगी घ्यावी लागते ग्रामपंचायतची गरज नसते परंतु मागील काही दिवसांपासून गावांमध्ये वातावरण खराब आहे.काही अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून मी सांगितले पाटोदा पोलीस खात्यांची परवानगी घ्यावी.परतु काही विघ्नसंतोषी लोक हट्ट धरून बसल्याने माझ्या तोंडातून बाँन्ड चुकीने निघालेला शब्द सर्व व्हायरल होत आहे.परंतु मी पध्दतशीर खरी परिस्थिति सांगितलेली व्हायरल होत नाही. मी स्वता पहिली छत्रपती शिवाजी महाराज जयंतीची पावती फाडलेली आहे. कारण मी स्वता छत्रपती शिवाजी महाराजांची लेक आहे. परंतु काही लोक यामध्ये राजकारण आणून राजकीय हेतूने मला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहे. असे चुंबळी गावचे सरपंच डॉ.रेशीम पवळ यांनी पत्रकार परिषदेत सांगितले आहे.

मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १६७/२०२५

(मार्फत विधिज्ञः- श्री ए एस ठोसर)

अर्जदार :- १. भाउसाहेब पि. कोंडीराम नवले, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा.पाली, ता.जि.बीड, २. सुग्रीव पि. कोंडीराम नवले, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द निरंक

**प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे कोंडीराम पि. गोविंद नवले हे/या दि. १७/०२/१९९६ रोजी पाली, ता.जि.बीड येथे मयत असुन अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले आहेत. मयतास मुलगी नाही. मयताची पत्नी हया दि. २५/०६/२००९ रोजी मयत झालेल्या आहेत. मयताचे आईवडील यापुर्वीच मयत आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: १७/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीखः- १३/०३/२०२५.

**आदेशावरून**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड**

जा.क्र.न.प. अंबड नामांतर २०२५/ ६०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक १०/२/२०२५

**नांव बदलण्याचा जाहिरनामा**

अर्जदार श्रीमती मिरा देविदास उबाळे

प्रकरण : सर्वे नं ३४/१ प्लॉट नं.११ सिटी सर्वे नं.३०६६ न.प.मि.नं.१८-१६२-११ चे हस्तांतर करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( ११ ) दर्शविलेल्या प्रमाण मोहल्ला येथे इमारतीध जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्यादी चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा

| | |
|---|---|
| पूर्व | -सर्वे नंबर ४०११ |
| पश्चिम | -१ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता |
| दक्षिण:- | - प्लॉट नंबर १० |
| उत्तर | - याच प्लॉट नंबर ११ मधील उर्वरीत भाग |

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

पान ६ वरून...

### भविष्याचा वेध घेत

आहे.सध्या आपण पाहतो की बरीच तरुणाई ही सोशल मीडियाच्या आहारी गेलेली आहे. त्यांचा दिवसातील बराचसा वेळ हा झोप व सोशल मीडियावर जात आहे.यातून आपल्याला आपण जे आपल्या आयुष्याचे ध्येय ठरवले आहे ते कदापि साध्य होणार नाही.अशी खंतही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.खऱ्या अर्थाने विचार केला तर तुमचे शिक्षण आता कुठे सुरू झाले आहे.पदवी मिळवले म्हणजे सर्व काही नाही तर त्या पदवीचा सदुपयोग आपल्या जीवनासाठी आपण करून घेतला पाहिजे. भविष्यात आपणास खूप काही शिकायचे आहे आणि आयुष्यात यशस्वी व्हायचे आहे. यासाठी ही पदवी म्हणजे तुमच्या आयुष्याला एक दिशा ठरवणारा दुवा म्हटला तरी काही वावगे ठरणार नाही.प्रमुख उपस्थितीमध्ये केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी देखील शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील वंचित घटकास न्याय मिळावा म्हणून संविधानामध्ये शिक्षणासाठी आरक्षणाची सोय करून ठेवली. समाजातील दैन्य विघटन जर घालवायचे असेल तर शिक्षणा तर शिवाय तरणोपाय नाही. म्हणून शिक्षण हा आयुष्याचा मूलभूत आधारस्तंभ आहे. जर आपण व्यवस्थित शिकलो आणि त्याचा सदुपयोग समाजासाठी व आपल्या आयुष्यासाठी केला तर आपण कुठेही कमी पडणार नाही अशा शुभेच्छा ही त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना दिल्या.या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना स्थानिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या या पदवीचा उपयोग समाजाच्या प्रगतीसाठी केला पाहिजे. समाजातील वेगवेगळ्या समस्या आता नवयुकांनी सोडवण्याची खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे आणि तुम्ही त्या नक्कीच सोडवताल अशी अपेक्षा त्यांनी याप्रसंगी व्यक्त करून भविष्यातील वाटचालीसाठी पदवीधर विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.या पदवी प्रदान समारंभाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर मुकुंद देवर्षी यांनी केले.त्यामध्ये त्यांनी सांगितले की १९५८ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर मराठवाड्यामध्ये शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचवण्याचे काम करत आहे. त्याचप्रमाणे आपली संस्था देखील गुणवत्ता व सामाजिक बांधिलकी हा धागा पकडून समाजात शैक्षणिक उत्थानासाठी कार्यरत आहे. आजचे कर्तव्यदक्ष अधिकारी तुमच्यासमोर महाविद्यालयाने या कार्यक्रमास बोलावले आहेत त्यांची प्रेरणा आपण विद्यार्थ्यांनी घेऊन आपणही त्यांच्यासारखे अधिकारी बनले पाहिजे वा वेगवेगळ्या क्षेत्रात महाविद्यालयाचे व आपल्या आई-वडिलांचे नाव चमकावले पाहिजे असे ते म्हणाले.या अगोदर विद्यार्थ्यांना पोस्टाने पदवी प्रमाणपत्र घरपोच दिले जायचे.पण आपण विद्यार्थी जी मेहनत करून पदवीचे शिक्षण पूर्ण करतात त्यांना सन्मानपूर्वक पदवी प्रदान केली जावी अशी चर्चा विद्यापीठ अधिकार मंडळात झाल्यानंतर प्रत्येक महाविद्यालयात हा पदवी प्रदान समारंभ अतिशय सन्मानपूर्वक आयोजित केला जात आहे.विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र नोंदणी कक्ष व अल्पोपाहाराची व्यवस्था महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आली होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश गटकळ व डॉ.कमलकिशोर लड्डा यांनी केले तर आभार मूल्यमापन विभाग प्रमुख डॉ. सिताराम इंगोले यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ.गजानन होंन्ना, डॉ.युवराज मुळये, पर्यवेक्षक परमेश्वर खेत्री,कला विभाग प्रमुख डॉ.गोरक्षनाथ फसले,विज्ञान विभाग प्रमुख डॉ. विनायक देशमुख, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.अशोक होके तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.या कार्यक्रमास २०० पेक्षा अधिक पदवीधर विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

पान ६ वरून...

### वारकरी संप्रदायातील मधुकर

आपल्यातून निघून जातो. चांगुलपणाचे मूर्तिमंत व्यक्तीमत्व असलेले मधुकर महाराज खाडे यांचे निधन झाले. ते निष्काम सेवा करणारे होते. भगवंताचे चिंतन करणारे मानवी शरीर स्वर्गात स्थान प्राप्त करते. त्यासाठी जात, कुळ, धर्म याची अट ईश्वराने घातलेली नाही. मधुकर महाराज खाडे हे सेवा करून मोकळे होत असायचे, त्यांनी कधीही मालक होण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांच्या निष्काम सेवेचे स्मरण रहावे, यासाठी भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेत समाधी व्हावी अशी अपेक्षा अर्जुन महाराज लटपटे यांनी व्यक्त केली. अलीकडे प्रत्येकाच्या मनात मालक होण्याची भावना असते. सेवा करण्याची वृत्ती लोप पावत चालली आहे. दास्यभक्ती ही सर्वश्रेष्ठ सेवा आहे. सेवेतून मानवी शरीर देखील देवरूप होऊ शकते, त्यासाठी तितका भक्तिभाव गरजेचा आहे, तो मधुकर महाराज खाडे यांच्या अंगी होता, असेही अर्जुन महाराज लटपटे म्हणाले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री यांचे किर्तन होणार

होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री यांचे मंगळवारी (दि.१८) किर्तन होणार आहे. या किर्तनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### पोखरी येथील लोकमान्य टिळक

विविध क्षणांना पारखं झालो याचे दुःख व्यक्त केले.तसेच कु.वैष्णवी गुळवे हिने सादर केलेल्या का कळेना अशी हरवली पाखरे या गीताने सर्वांना याप्रसंगी अंतर्मुख केले.

शिक्षक मनोगतात ज्ञानेश मातेकर यांनी आपल्या मनातील विद्यार्थ्यांच्या हृदय आठवणींना उजाळा दिला.

प्रमुख मार्गदर्शक तेलंगे यांनी

१०वी नंतर पुढे काय? याबाबत मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना म्हणाले की,नव्या युगात झेप घेताना प्रत्येकाला स्व ची ओळख करून घेणे महत्त्वाचे आहे.भविष्याचा वेध घेताना ध्येय प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये ध्यास,नियोजन,योग, स्वाध्याय इ.मूल्यांची रुजवणूक करून घेणे आवश्यक आहे असे विचार मांडून त्यांनी सर्वांना पुढील काळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.तसेच१०वी वर्गाचा निकाल उंचावण्यासाठी शाळेच्या वतीने करण्यात आलेले विविध प्रयत्न याचा आढावा घेतला. अध्यक्षीय समारोपात मार्गदर्शन करताना संजयराव विभूते यांनी शाळेने दिलेल्या संस्काररूपी शिदोरीच्या आधारे विद्यार्थ्यांनी समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करावी.तसेच पुढील परीक्षेला सर्वांनी आत्मविश्वासाने सामोरे जावे असे आवाहन केले.सर्व १०वीच्या विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या निधीतून शाळेप्रती ऋण व्यक्त करत विद्यालयास शालेय कामकाजासाठी मोठा टेबल भेट दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश मातेकर,वैयक्तिक पद्य कु.नेहा वाघमारे ,प्रास्ताविक व परिचय नितीन चौधरी तर आभार प्रदर्शन राकेश मोरे यांनी केले. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता शांती मंत्राने करण्यात आली.

### छत्रपती शिवाजी विद्यालयाचे

यशस्वीतेसाठी भास्कर पारगावकर, आप्पासाहेब होके, विष्णू गडकर, माधव घोलप,दत्ता इंगळे,मुरलीधर भाळशंकर,अनंत राठोड,सय्यद गयास फरजाना पठाण,सत्यप्रिया होके पाटील,स्मिता डाके,शिल्पा शिनगारे , तुळशीराम साळवे, पंकज कळसकर शेख शहाणूर, ज्ञानेश्वर पवार, मिलिंद देशपांडे, मंजुषा गाजरे, कैलास कदम, रविकुमार साळवे, शेख समिना,दत्ता पांडे,दिनकर काळे, प्रथमेश लांडगे, विशाल सुंदर्डे यांनी प्रयत्न केले.

### श्री गणेश विद्या मंदिर

यांविषयी आढावा घेऊन सर्व सेवकांच्या विद्यार्थ्यांप्रती असणाऱ्या तळमळीविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.यानंतर शाळेचे जेष्ठ शिक्षक एफ एस जाधवर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व सांगून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.नंतर शाळेचे मुख्याध्यापक आर एम हाके यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.शुभेच्छा समारंभाच्या निमित्ताने इ.१०वीच्या विद्यार्थ्यांकडून विद्यालयाला ७५००रू. किंमतीच्या ३० थोर महापुरूषांच्या सुंदर प्रतिमा सप्रेम भेट म्हणून देण्यात आल्या. विद्यालयाला दिलेल्या ह्या सप्रेम भेटीबद्दल शाळेचे जेष्ठ शिक्षक एफ एस जाधवर यांनी इ.१०च्या सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.यानंतर सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात येऊन कार्यक्रम संपन्न झाला.

### शंभर कुटूंबांना जीवनावश्यक

आधार नाही त्यांचा उदरनिर्वाह भागविण्या साठी मानवलोकने पुढाकार घेऊन लोकसहभागातून दर महिन्याला जीवनावश्यक वस्तुंचे वितरण केले जाते.जे भरघोस मदत करतात त्यांच्यामुळे हा उपक्रम सुरू आहे असे त्या म्हणाल्या. शाम सरवदे यांनी प्रास्तविक केले यावेळी संजना आपेट, सावित्री सगरे यांच्यासह इतर उपस्थित होते.

### महाशिवरात्री व संताजी

संताजी महाराज जगनाडे यांच्या प्रतिमेची मिरवणूक सवाद्य , टाळ मृदुंगाच्या गजरात निघणार असून भाविकांनी यात सहभागी व्हावे ,मिरवणूक भामेश्वर मंदिरात आल्यानंतर विठ्ठल रुख्मिणी संस्थांनचे मठाधिपती सतीश महाराज उरणकर यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर भाविकांना महाप्रसाद भगवान हरिभाऊ मुळे यांच्या वतीने आयोजन करण्यात आला आहे या सर्व भक्तीरसाचा पंच क्रोशितील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन भामेश्वर मित्रमंडळ व संताजी युवक मंडळ यांनी केले

### निराधारांच्या बंद

कालावधीमध्ये किती बैठका झाल्या?व किती पगारी मंजुर करण्यात आल्या?याची माहिती देणे,तसेच किती निराधार मयत झाले याची नोंद आपल्या कार्यालयाकडे आहे का?इत्यादी निराधारांच्या अनुषंगाने आवश्यक अशा प्रश्नांना वाचा फोडत सय्यद सलीमबापू यांनी आपल्या कार्यकर्त्यांमार्फत वरील सर्व मागण्या पूर्ण करण्यात याव्यात अशी मागणी लावून धरली.ॲड.सय्यद अल्ताफ,शेख इलियास,मिर्झा महमूद, बाबासाहेब साळवे.समीर सिद्दिकी,शेख महमूद,शेख अंजरभाई, व असंख्य निराधार महिला व पुरुष उपस्थित होते.

### १८ फेब्रुवारी रोजी जवळा फकीर

मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले,डॉ.सिद्धार्थ हत्तीअंबीरे,प्रा. प्रदीप रोडे,राजेंद्र कांबळे,प्रकाश कोकाटे,भाई कीर्तीकुमार बुरांडे, जवळा फकीरचे सरपंच त्र्यंबक साबळे, माजी सरपंच सुनीता मिसाळ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या धम्म परिषदेस धम्म बांधवांनी व उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन धम्म उपासक डॉ संजय नाकलगावकर यांनी केले आहे.

# मराठवाड्यात २४ तासांनंतर तापमानात मोठे बदल

राज्यात तापमानवाढ होणार असून गेल्या काही दिवसांपासून तापमानात चढउतार पहायला मिळत असून मराठवाड्यात २४ तासांत मोठे बदल होणार असल्याचं सांगण्यात आलंय.प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार मराठवाडयात पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील चोवीस तासात कमाल तापमानात () फारशी तफावत जाणवणार नाही व त्यानंतर दक्षिण भागात हळूहळू २ ते ३ अं.से. ने वाढ होण्याची शक्यता आहे. पुढील चार ते पाच दिवसात किमान तापमानात हळूहळू २ ते ३ अं.से. ने वाढ होण्याची शक्यता आहे.वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीने पुढील प्रमाणे कृषि हवामान आधारीत कृषि सल्ल्याची शिफारश केली आहे. कसे करावे पीक व्यवस्थापन? ऊस पिकास आवश्यकतेनूसार पाणी द्यावे. ऊस पिकात खूरपणी करून तण नियंत्रण करावे. हंगामी ऊसाची लागवड १५ फेब्रूवारी पर्यंत करता येते. ऊस पिकावर पांढऱ्या माशीचा प्रादूर्भाव दिसून येत आहे, याच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३० % ३६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. हळद काढणी करण्यापूर्वी पंधरा दिवस आधी पिकाला पाणी देणे बंद करावे. हळद पिकाची पाने पिवळी पडून जमिनीवर लोळतात तेव्हा हळदीची काढणी करावी. कंद काढणीपूर्वी संपूर्ण पाने जमिनीलगत कापून घ्यावी. उशीरा पेरणी केलेल्या हरभरा पिकास आवश्यकतेनूसार तूषार सिंचन पध्दतीने पाणी द्यावे.





उशीरा पेरणी केलेल्या हरभरा पिकात घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थानासाठी शेतामध्ये इंग्रजी आकाराचे प्रति एकर २० पक्षी थांबे लावावेत व घाटेअळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति एकरी २ कामगंध सापळे लावावेत. हरभरा पिकात घाटे अळीच्या व्यवस्थानासाठी अळी अवस्था लहान असताना एच.ए.एन.पी.व्ही ५०० एल.ई. विषाणूची १० मिली प्रति १० लिटर पाणी (२०० मिली प्रति एकर) याप्रमाणे फवारणी करावी. तर किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर इमामेक्टिन बेंझोएट ५ % - ४.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी याप्रमाणे (प्रती एकर ८८ ग्रॅम) किंवा क्लोरॅंट्रानिलीप्रोल १८.५ % - ३ मिली प्रती १० लिटर पाणी याप्रमाणे (प्रती एकर ६० मिली) किंवा फ्लुबेंडामाईड २० % - ५ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी याप्रमाणे (प्रती एकर १२५ ग्रॅम) फवारावे. वेळेवर पेरणी केलेल्या व काढणीस तयार असलेल्या हरभरा पिकाची काढणी करून घ्यावी.

करडई पिकात आवश्यकतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे. उशीरा पेरणी केलेल्या करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३०% १३ मिली किंवा असिफेट ७५% १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. वेळेवर पेरणी केलेल्या उन्हाळी तीळ पिकास मध्यम जमिनीत ८ ते १० दिवसांनी व भारी जमिनीत १२ ते १५ दिवसांच्या अंतराने सिंचन करावे. सिंचन हे शक्यतो तूषार सिंचन पध्दतीने करावे.

तापमानात होत असलेल्या वाढीमूळे संत्रा/ मोसंबी बागेत आवश्यकतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे. बागेत अन्नद्रव्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे यामध्ये चिलेटेड झिंक ५ ग्रॅम + चिलेटेड आयर्न ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. डाळींब फळांची काढणी झाल्यानंतर बागेतील वाळलेल्या व रोगग्रस्त फांद्या काढून टाकाव्यात व बाग स्वच्छ करावी. डाळींब बागेस आवश्यकतेनूसार पाणी द्यावे. चिकू बागेत अंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनूसार पाणी द्यावे.

भाजीपाला : भाजीपाला पिकात खूरपणी करून भाजीपाला पिक तण विरहीत ठेवावे. काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकाची पिकाची काढणी करून घ्यावी. नविन लागवड केलेल्या व गादी वाफ्यावरील रोपांना आवश्यकतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे. मिरची पिकावरील फुल किडींच्या व्यवस्थापनासाठी ॲसिटामेप्रिड २०% एसपी २ ग्रॅम किंवा सायअँट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी १२ मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५% एसजी ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

तुती रेशीम उद्योग : रेशीम उद्योजकांच्या रेशीम अळ्या कोष न करणे किंवा पोचट कोष होणे हा प्रश्न आहे. बहुतांशी शेतकरी कापूस, ऊस, सोयाबीन व भाजीपाला ईत्यादी पिकांकडून तुती लागवडीकडे वळलेले आहेत. पुर्वी शेतातील जमिनीत पीक संरक्षण करण्यासाठी वापरात आलेले किटकनाशक उदा. कोराझीन किंवा बुरशीनाशक, तणनाशक उदा. ग्लायफोसेट ईत्यादी चे प्रमाण किंवा शिल्लक राहीलेला अंश जमिनीत राहिलेला असतो. नंतर तेथे तुती लागवड केली जाते आणि तुतीला आलेली पाने रेशीम किटकास खाद्य म्हणून दिल्यावर किटक मरताना दिसतात किंवा अळ्या कोष करत नाहीत, पोचट कोष होतात. त्यावर उपाय म्हणजे २० टन कुजलेले शेणखत प्रति हेक्टर किंवा ५ टन गांडूळ खत समान दोन हप्त्यात जुन व नोव्हेंबर महिन्यात जमिनीत द्यावे व नंतर हलके पाणी द्यावे.

# पौष्टिक चाऱ्यासाठी वापरा हे तंत्र

राज्यात धान लागवडीखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. अनके शेतकरी धान शेतीसोबतच दुग्ध व्यवसाय देखील करत असतात. धान काढणीनंतर शेतकरी धानाचा शेतातील पेंढा जाळून टाकतात. मात्र धानाच्या काढणीननंतर मागे राहिलेल्या पेंढ्यांची कुट्टी करून दुधाळ जनावरांना चारा म्हणून वापरल्यास, मोठया प्रमाणात चारा तर उपलब्ध होणार आहेच. याशिवाय धानाच्या पेंढ्यातील पौष्टिक घटकांमुळे दुधाळ जनावरांच्या दूध उत्पादनात वाढ देखील केली जाऊ शकते. त्यामुळे धानाचा पेंढा हा दुधाळ जनावरांचे दूध वाढवण्यासाठी खूप महत्तवपूर्ण मानला गेला आहे.

आपल्या देशात कोरड्या चाऱ्याची नेहमीच २३.४ टक्क्यांपर्यंत तर ओल्या चाऱ्याची ११.२४ टक्क्यांपर्यंत कमतरता जाणवत असते. अशा वेळी शेतकऱ्यांनी धानाची उन्हाळी दिवसांसाठी धानाची कुट्टी करून, त्यास व्यवस्थित साठवून ठेवणे खूप गरजेचे असते. धानाच्या कुट्टी अर्थात भुसामध्ये कोरड्या घटकांचे प्रमाण ९० टक्के तर १० टक्के ओलावा असतो. याशिवाय धानाच्या भुसामध्ये ३ टक्के प्रोटीन आणि ३० टक्के फायबरचे प्रमाण असते. याशिवाय धानाच्या कुट्टीमध्ये १७ टक्के सिलिका आढळून येते. यात अर्धा टक्के कॅल्शियम, ०.१ टक्के फॉस्फरस देखील आढळून येते. तथा धानाच्या कुट्टीमध्ये पचनशक्ती ३० ते ५० टक्के इतकी असते. मात्र, दूध उत्पादक शेतकऱ्यांनी भाताच्या पेंढ्यासोबतच दुधाळ जनावरांना अन्य चारा घालणे देखील महत्वाचे असते. २१ दिवसानंतर युरिया खत हे अमोनिया वायूमध्ये परावर्तित होऊन ते धानाच्या कुट्टीची पौष्टिकता आणखी वाढवेल. याशिवाय अशी युरिया उपचारात कुट्टी जनावरांना पचनासाठी देखील उत्तम असते. इतकेच नाही तर युरियाच्या या शिडकावामुळे धानाच्या कुट्टी किंवा भुसातील जिवाणू देखील होऊन जातात. अर्थात यामुळे दुधाळ जनावरांना आरोग्यदायी आहार मिळून सुद्ध उत्पादनात भरघोस वाढ होण्यास मदत होईल.

कुट्टीमध्ये मिसळा 'या' गोष्टी :धानाच्या कुट्टीची किंवा भुसाची पचनशक्ती वाढण्यासाठी, त्यात यूरिया (अमोनिया) मिक्स करावा. यासाठी १०० किलोग्रॅम धान कुट्टीसाठी ३३ लीटर पाणी आणि ४ किलोग्रॅम यूरियाचे मिश्रण करून ते कुट्टीमध्ये मिश्रित किंवा शिंपडून मिक्स करावे. ज्यामुळे दुधाळ जनावरांच्या दूध उत्पादनात वाढ होण्यासाठी खूप मदत होते. कुट्टीवर युरियाचे मिश्रण शिंपल्यानंतर साधारणपणे २१ दिवसांपर्यंत असा चारा झाकून ठेवावा.

# पपई फळबाग लागवड आणि व्यवस्थापन

भारतात पपईची लागवड महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, आसाम, बिहार व पश्चिम बंगाल इ. राज्यात मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. महाराष्ट्रात जळगाव, धुळे, नंदुरबार, अमरावती, जालना, नाशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूर व सातारा या जिल्ह्यात पपई पिकाची लागवड केली जाते. कमी कालावधीत, कमी खर्चात चांगले उत्पन्न पपई या पिकातून मिळते. पपईचा उपयोग फळ म्हणून खाण्यासाठी वापरण्यात येणारी टुटी-फ्रुटी, जॅम, जेली इ. पदार्थ तयार करण्यासाठी, तर पपईच्या पेपेनपासून औषधे, च्युईंगम तयार करतात.

लागवडीसाठी आवश्यक बाबी : पपई लागवड करण्यासाठी सुपीक, मध्यम काळी रेतीमिश्रीत पोयटा जमीन योग्य ठरते. जमीन काळी असल्यास पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी आवश्यक असते. तसेच मुख्य खोडाभोवती कायमस्वरूपी पाणी साठले नाही पाहिजे जमीन मध्यम ते रेती मिश्रित पोयटायुक्त असल्यास, पाणी साठव्याची पात्रता वाढवण्यासाठी योग्य कुजलेल्या सेंद्रिय खतांचा वापर करणे गरजेचे असते. पपई फळपिकला यशस्वीरित्या उत्पादनासाठी सरासरी १५-३० सें तापमानाची आवश्यकता ठरते. पपई पिकासाठी जास्तीत जास्त तापमान ४४ सें तर किमान १० सें पर्यंत सहनशीलता असते. पपई पिक उष्ण कटिबंधात वाढणारे आहे.

पपई लागवडीसाठी हंगाम : पपई लागवड वर्षभर मुख्यत्वे जून- जुलै, सप्टेंबर- ऑक्टोंबर आणि जानेवारी-फेब्रुवारी या तीन हंगामात करतात.

पपई लागवड कशी करावी : पपई लागवड बियांपासून रोपे तयार केली जाते. साधारणत: १ हे. क्षेत्रासाठी लागवड करण्यासाठी २५०-३०० ग्रॅम. बियाण्यांपासून रोपवाटिका तयार करावी. पपईची जात द्विलिंगी असल्यास जास्त बियाणे मात्राची आवश्यकता असते. जर जात उभयलिंगी असेल तर कमी बियाणे मात्राची आवश्यकता असते. द्विलिंगी जातींच्या झाडामध्ये ५०% नर



झाडाची आवश्यकता असते अशा वेळी वेळेस फुलोरा अवस्थेमध्ये असताना अतिरिक्त नराचे झाडे उपटून टाकावी लागतात. म्हणून अशा ठिकाणी २-३ रोपांची लागण करणे आवश्यक असते.पपई रोपवाटिका तयार करणे : पपई रोपवाटिका माध्यम तयार करण्यासाठी ५ किलो कोकोपिट+२.५ किलो पोयटा माती+अधिक कुजलेल शेणखत+१०० ग्रॅम ट्रायकोडर्मा+१०० ग्रॅम. १९:१९:१९ खत या प्रमाणात मिश्रण एकजीव करून ते ट्रे किंवा पॉलीथीन बॅगमध्ये भरून द्यावे. तसेच या माध्यमामध्ये बिया १.५ सें.मी खोलीवर टोकाव्यात. बियाणे टाकल्यानंतर अलगत झाकून टाकावे व झारीच्या सहाय्याने पाणी द्यावे. तसेच रोपे (पॉलीथीन बॅगमध्ये किंवा ट्रे) शेडनेट मध्ये ठेवावेत.

पपई लागवड पद्धत : पपई लागवडीपूर्वी जमिनीची आडवी उभी नांगरणी करावी. कुळवाने वखरपाळी देऊन ढेकळे फोडून घ्यावीत व जमीन सपाट करून घ्यावी. पपई लागवड २.५ २.५ किंवा २.२५ २.२५ मी अंतरावर करावी. पपई लागवडीसाठी दिड दोन महिन्याची रोपे वापरावीत.

पपई बागेसाठी खत व्यवस्थापण : ज्या क्षेत्रामध्ये पपई लागवड करायची आहे त्या क्षेत्रामध्ये आडवी उभी नागरणी करताना प्रती हेक्टर २० टन योग्य कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत मिसळून द्यावे. लागवडीनंतर प्रत्येक झाडास युरिया १०८ ग्रॅ. (नत्र ५०. ग्रॅ.) डी.ए.पी १०८ ग्रॅ. (स्फुरद ५० ग्रॅ.) एम.ओ.पी. ८३ ग्रॅ. (पालाश ५० ग्रॅ.) द्यावे.

पपई उत्पादनासाठी विशेष बाबी : द्विलिंगी जातींची लागवड केल्यास पपई बागेमध्ये १०% नरांच्या झाडांची आवश्यकता असते. उदा. वॉशिंग्टन, कोईमतूर-५ कोईमतूर-६, पुसा डॉर्फ, पुसा नन्हा, पुसा जॉईंट इ. १०% नराची झाडे क्षेत्रामध्ये विखुरलेल्या स्वरुपात लावावीत (असावी). इतर झाडे उपटून टाकावीत. उभयलिंगी पपईची जातीची लागवड करण्यासाठी प्रत्येक ठिकाणी एकच रोप लावावे. उदा. कुर्ग, हनी ड्यू, अर्का प्रभात, सनराईज सोलो, पुसा डेलीसियस इ.

# असे करा डाळिंबावरील तेल्या रोगाचे व्यवस्थापन


डाळिंबावरील बॅक्टेरीयल ब्लाईट रोग म्हणजेच तेल्या हा प्रामुख्याने जिवाणूजन्य असून झॅन्थोमोनास एक्झानोपोडीस पीव्ही पुनीकिया जिवाणूमुळे होतो. या रोगास अनु जीव जन्य करपा असे म्हणतात. महाराष्ट्रात या रोगाचा शिरकाव रोगग्रस्त कलमांद्वारे झालेला असून या रोगाचा प्रादुर्भाव सर्वप्रथम कर्नाटक राज्याच्या सीमेलगतचा भागात डाळिंबाच्या रुबि या जातीवर सर्वप्रथम दिसून आला. या रोगामुळे डाळिंबावर तेलकट डाग पडतात. याचा प्रादुर्भाव पाने, फुले खोड आणि फळांवर होतो.

पान :सुरुवातीस पानावर लहान तेलकट किंवा पाणथळ डाग दिसतात. कालांतराने काळपट होतात व डागा भोवती पिवळे वलय दिसते. तसेच ते मोठे होऊन तपकिरी ते काळे रंगाचे होतात. उन्हात हे डाग बघितले की तेलासारखे चमकतात. डाग मोठा झाल्यावर पाने पिवळी पडून गळून पडतात.

फुल :फुलांवर व कळ्यांवर गर्द तपकिरी व काळपट डाग पडतात. पुढे यामुळे फुलांची व फळांची गळ होते.

खोड व फांद्यावर :प्रामुख्याने खोडावर व फांद्यांवर सुरुवातीला काळपट किंवा तेलकट डाग गोलाकार दिसतात. खोडावर या डागाणे गर्द लिंग किंवा खाच तयार होते व तेथून झाड मोडते. तसेच फांद्यांवर डागांची तीव्रता वाढल्यावर फांद्या डागा पासून मोडतात.

फळे :फळावर सुरुवातीला एकदम लहान आकाराचे पाणथळ तेलकट डाग दिसतात.कालांतराने हे डाग तपकिरी काळपट



दिसतात व त्यावर भेगा पडतात. फळांवर लहान डाग एकत्र आले की मोठ्या डागात रूपांतर होते. फळांवर या डागांमुळे आडवे उभे तडे जातात. फळांची प्रत पूर्णपणे खराब होते व तडे मोठे झाल्यावर फळे सडतात आणि गळून पडतात.

रोगासाठी कोणत्या बाबी अनुकूल ठरतात : या रोगाच्या जिवाणूंची वाढ २८ ते ३२ अंश सेल्सिअस तापमान तसेच वातावरणातील आद्रता ८० टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास झपाट्याने होते.

बागेत किंवा बागेत शेजारी तेलकट डाग रोगाच्या अवशेष असणे. बागेत स्वच्छता असणे म्हणजे तणांचे मोठ्या प्रमाणावर वाढ असणे. ढगाळ व पावसाळी हवामान, वादळी पाऊस आणि वातावरणातील आर्द्रता जास्त असणे. रोगग्रस्त बागेतील गुटी कलमांचा वापर.

या रोगाचा प्रसार कसा होतो? याचा प्रसार प्रामुख्याने बॅक्टेरीयल ब्लाईट ग्रस्त मातृ वृक्षापासून बनविलेल्या रोपाद्वारे होतो. याशिवाय रोगट डागां वरून उडणारे पावसाचे थेंब, पाट पद्धतीने दिलेले ओलिताचे पाणी, निर्जंतुकीकरण करता वापरण्यात येणारी छाटणीची अवजारे, शेत मजूरांचे आवागमन तसेच विविध कीटक आधारे या रोगाचा प्रसार होतो.

तेल्या रोगाचे एकात्मिक रोग नियंत्रण : रोप कॅल्शियम हायड्रोक्लोराइड निर्जंतुक केलेल्या खड्ड्यात लावावे.

रोपांची लागवड कमीत कमी साडेचार मीटर बाय ३० मीटर अंतरावर करावी आणि प्रत्येक ठिकाणी तीन खोड ठेवावी. स्वच्छता मोहीम काळजीपूर्वक राबवावी. खाली जमिनीवर पडलेली पाने गोळा करून नष्ट करावेत. बहार धरताना जमिनीवरील रोगट जिवाणूंची संख्या कमी करण्यासाठी ब्लिचिंग पावडर दीडशे ग्रॅम प्रति पाच ते सहा लिटर पाण्यात मिसळून झाडाखाली भिजवन करावी किंवा झाडाखाली भुकटी हेक्टरी २० किलो धुरळावि.

फळे काढणी पावसाळ्यात झाली असेल तर ब्रोनोपोल ५०० पीपीएम फवारावे. (ब्रोमोपोल ५० ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात) संपूर्ण फळे काढणी झाल्यानंतर बागेला तीन महिने विश्रांती घ्यावी. बहार घेण्यापूर्वी संपूर्ण पानगळ करून घ्यावी तसेच रोगट फांद्यांची छाटणी करावी. खाली पडलेली संपूर्ण पाने व छाटलेली रोगट अवशेष गोळा करून जाळून टाकावीत.छाटणी करताना कात्री प्रत्येक वेळी एक टक्का डेटॉल च्या द्रावणात निर्जंतुक करून घ्यावी. छाटणी झाल्यानंतर लगेच कापलेल्या भागावर १० टक्के बोर्डो पेस्ट लावावी. झाडाच्या खोडाला नीम ओईल + बॅक्टेरिया नाशक ( ५०० पीपीएम)+ कॅप्टन ०.५ टक्के याचा मुलामा द्यावा. पानगळ व छाटणीनंतर बॅक्टेरिया नाशक + कॅप्टन ०.५टक्के यांची फवारणी करावी. नवीन पालवी फुटल्यावर बॅक्टेरिया नाशक ( २५० पीपीएम)/ बोर्डो मिश्रण (एक टक्का)+ कॅप्टन (०.२५ टक्के) ची फवारणी करावी.




## महत्वाच्या घटना

१९६५ : 'गांबिया'ला इंग्लंडकडून स्वातंत्र्य मिळाले.
१९७९ : सहारा वाळवंटाच्या दक्षिण अल्जीरियातील भागात बर्फ पडले. सहारा वाळवंटात बर्फ पडण्याची ही एकमेव नोंद आहे.
१९९८ : ज्येष्ठ गांधीवादी नेते, माजी केंद्रीय मंत्री व महाराष्ट्राचे माजी राज्यपाल सी. सुब्रमण्यन यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर
२००१ : संगीतकार व गायक भूपेन हजारिका यांना मध्यप्रदेश सरकारचा 'लता मंगेशकर पुरस्कार' प्रदान
२००६ : आजच्या दिवशी भारत पाकिस्तान मध्ये थार एक्सप्रेस ची सुरुवात.
२००६ : आजच्या दिवशी महाराष्ट्राच्या एका पोल्ट्री फार्म येथे देशातील पहिले बर्ड फ्लू ची केस नोंदविल्या गेली.
२०१४ : आजच्या दिवशी संसद मध्ये आंध्रप्रदेश पासून तेलंगाना हे भारताचे २९ वे नवीन राज्य बनण्याचा प्रस्ताव मंजूर झाला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४८६ : योगी चैतन्य महाप्रभू (मृत्यू: १५ जून १५३४)
१७४५ : अलासांड्रो व्होल्टा इटालियन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ५ मार्च १८२७)
१८२३ : रावबहादूर गोपाळ हरी देशमुख ऊर्फ 'लोकहितवादी' पत्रकार, समाजसुधारक व इतिहासकार. १८४८ ते १८५० या काळात 'प्रभाकर' या साप्ताहिकातून त्यांनी शतपत्रांचे लेखन केले. स्त्रियांचा कोंडमारा करणार्या रुढींवर त्यांनी प्रहार केला. त्यांनी ४३ मराठी ग्रंथ लिहिले. 'लक्ष्मीज्ञान' हा त्यांचा ग्रंथ हा अर्थशास्त्रावरील पहिला मराठी ग्रंथ आहे. (मृत्यू: ९ आक्टोबर १८९२)
१८३६ : रामकृष्ण खुदिराम परमहंस तथा गदाधर चट्टोपाध्याय स्वामी विवेकानंदांचे गुरू (मृत्यू: १६ ऑगस्ट १८८६ कलकत्ता, पश्चिम बंगाल)
१८७१ : बॅ. विठ्ठलभाई पटेल थोर देशभक्त, राजकीय नेते आणि हिंदुस्थानच्या केंद्रीय कायदेमंडळाचे पहिले भारतीय अध्यक्ष, सरदार वल्लभभाई पटेल यांचे थोरले बंधू (मृत्यू: २२ आक्टोबर १९३३)
१८८३ : क्रांतिवीर मदनलाल धिंग्रा (मृत्यू: १७ ऑगस्ट १९०९)
१८९८ : एन्झो फेरारी रेस कार निर्माते आणि ड्रायव्हर (मृत्यू: १४ ऑगस्ट १९८८)
१८९९ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक जयनारायण व्यास यांचा जन्म.
१९११ : कॅप्टन वासुदेव श्रीपाद बेलवलकर ऐतिहासिक कादंबरीकार (मृत्यू: २९ जून २०००)
१९१४ : ऊर्दू शायर व गीतकार जान निसार अख्तर यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑगस्ट १९७६)
१९२६ : नलिनी जयवंत अभिनेत्री (मृत्यू: २० डिसेंबर २०१०)
१९२७ : मोहम्मद झहूर खय्याम हाश्मी ऊर्फ 'खय्याम' संगीतकार
१९३३ : नवाब बानू ऊर्फ 'निम्मी' अभिनेत्री
१९६२ : भारतीय चित्रपट अभिनेते विपिन शर्मा यांचा जन्म.
१९६६ : प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक साजिद नाडीवाला यांचा जन्म.
१९८६ : प्रसिद्ध हिंदी धारावाहिक कलाकार जिया मानेक यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२९४ : कुबलाई खान मंगोल सम्राट (जन्म: २३ सप्टेंबर १२१५)
१४०५ : तैमूरलंग मंगोल सरदार (जन्म: ९ एप्रिल १३३६)
१५४६ : आजच्या दिवशी जर्मन धर्मसुधारक मार्टिन लुथर यांचे निधन.
१५६४ : मायकेल अँजेलो इटालियन शिल्पकार आणि चित्रकार (जन्म: ६ मार्च १४७५)
१९६७ : जे. रॉबर्ट ओपेनहायमर अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ, अणूबॉम्बचे जनक (जन्म: २२ एप्रिल १९०४)
१९९२ : नारायण श्रीधर बेन्द्रे आदिम कलेपासून चिनी चित्रकलेपर्यंत अनेक शैलीविशेष आत्मसात केलेले चित्रकार (जन्म: २१ ऑगस्ट १९१०)
१९९४ : पंडित गोपीकृष्ण कथ्थक नृत्यशैलीचे बनारस घराण्याचे नर्तक, नृत्यदिग्दर्शक व अभिनेते. भरतनाट्यम, कथकली, मणिपुरी आदी नृत्यप्रकारांतही त्यांनी नैपुण्य मिळवले होते. १९५७ मध्ये त्यांनी ८२ दिवसांत ८७ कार्यक्रम करुन विक्रम केला. (जन्म: २२ ऑगस्ट १९३५)
२०१६ : आजच्या दिवशी प्रसिद्ध गायक अब्दुल राशिद ख़ान यांचे निधन.
२०१७ : इंडोनेशिया च्या एका प्रांताचे माजी गवर्नर माइकल ओजियो यांचे निधन.

# नॅनो संमिश्रणापासून सौरऊर्जा निर्मितीस जर्मन सरकारचे पेटंट

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी नॅनो संमिश्रणापासून सौरऊर्जा निर्माण करणारी अभिनव बाइंडर विरहित पद्धती विकसित केली आहे. या पद्धतीस जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेसचे संचालक तथा रसायनशास्त्रज्ञ डॉ. सागर डेळेकर यांच्यासह डॉ. क्रांतिवीर मोरे, डॉ. तुकाराम डोंगळे, भारती विद्यापीठाच्या मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ. सुनील कदम, डॉ. प्रमोद कोयले, डॉ. अनंत दोडामणी (एस.जी.एम. कॉलेज, कराड), डॉ. दीपक कुंभार (ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी) यांनी या संशोधन प्रक्रियेत सहभाग घेतला. हे संशोधन सौरऊर्जा निर्मिती क्षेत्राला गती देणारे ठरेल, असा विश्वास डॉ. डेळेकर यांनी व्यक्त केला. तयार केलेली वेगवेगळी नॅनो संमिश्रे आणि त्यापासून तयार करावयाचे उपकरण कमीत कमी तापमानात आणि अत्यल्प वेळेमध्ये बनवता येते, ते सुलभतेने हाताळता येते. हे उपकरण तसेच ते तयार करण्याची पद्धत सौरऊर्जा क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल, असेही ते म्हणाले. सौरऊर्जेचे उत्पादन त्या उपकरणामध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक घटकांवर अवलंबून असते. तसेच ते उपकरण बनविण्यासाठी वापरली जाणारी पद्धतही महत्त्वाची ठरते. विद्यापीठातील संशोधकांनी वेगवेगळ्या नॅनो संमिश्रणापासून सौरऊर्जा निर्माण करणारी पद्धत कमीत कमी वेळेमध्ये आणि कमी खर्चामध्ये तयार केली आहे. यामध्ये कॅडमिअम सल्फाइड क्वांटम डॉट, नैसर्गिक रंग, टायटॅनियम डायऑक्साइडच्या नॅनो मूलद्रव्यांचा वापर केला आहे. या नावीन्यपूर्ण संशोधनामुळे सौरऊर्जा क्षेत्राला नवीन चालना मिळेल. या संशोधनाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ.विलास शिंदे, विभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले.

# साहित्य संमेलनाच्या विचार पिठाला आण्णाभाऊ साठे यांचे नाव

## पत्रकर परिषद:अजिंक्य चांदणे म्हणाले डीपीआयच्या लढ्याला यश

बीड। प्रतिनिधी

देशाची राजधानी दिल्ली येथे ९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन होत आहे. त्या साहित्य संमेलनाच्या महत्वाच्या स्थळाला साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात येणार आहे. तसे पत्र अखिल भारतीय साहित्य मंडळाकडून डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाला देण्यात आले आहे.अशी माहिती डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी पत्रकार परिषदेत दिली. बीड शहरातील हॉटेल निलकमल येथे सोमवार (दि.१७) रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अजिंक्य चांदणे बोलत होते. या पत्रकार परिषदेला उत्तम पवार, बाप्पा सोनवणे, सुभाष लोणके, नवनाथ कांबळे, विजय चांदणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अजिंक्य चांदणे म्हणाले की, दिल्लीत येत्या दि.२१,२२, २३ या कालावधीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. या कार्यक्रमाचे उदघाटक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी असून स्वागताध्यक्ष म्हणून शरदचंद्र पवार असणार आहेत. अजिंक्य चांदणे असंही म्हणाले की,मराठी साहित्यात आण्णाभाऊ साठे यांचे नाव अग्रगण्य असेच आहे. त्यांच्या फकिरा कादंबरी जगातील २७ भाषांमध्ये भाषांतरीत झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या नावाची साहित्य संमेलनात दखल घेतली जावी, यासाठी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाकडून राज्यातील बीड,सातारा, कोल्हापूर, सांगली, वाशीम, लातूर, जालना, छत्रपती संभाजी नगर,बुलढाणा आशा विविध जिल्ह्यात या विषयाच्या अनुषंगाने आंदोलने झाली.संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मार्फत साहित्य मंडळ पुणे यांना लेखी निवेदने देण्यात आली होती. या चळवळीला व आंदोलनांना योग्य प्रतिसाद देत साहित्य मंडळाने आमच्या आंदोलनाची व मागणीची दखल घेत, पक्षाच्या नावाने पत्र जाहीर करून अण्णाभाऊंचा यथोचित सन्मान केला जाईल असे कळवले आहे. त्यामुळे ही पत्रकार परिषद घेऊन आम्ही साहित्य मंडळ पुणे व संमेलनाचे स्वागत अध्यक्ष शरदचंद्र पवार यांचे आभार व्यक्त करत आहोत.तसेच हा लढा यशस्वी करणाऱ्या सर्व अण्णाभाऊ साठे अनुयायांचे, पक्ष पदाधिकाऱ्यांचेही आम्ही आभार व्यक्त करत आहोत.असे अजिंक्य चांदणे म्हणाले.




### आण्णा साहित्याची खान

साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून ३५ कादंबऱ्या, १४ लोकनाट्य,१३ कथा संग्रह, १० पोवाडे, ७ चित्रपट कथा, १ प्रवास वर्णन असा मराठीचा खजिना तयार केला. आण्णाभाऊ साठे यांची फकिरा कादंबरी जगातल्या २७ भाषांमध्ये भाषांतरीत आहे.

### वाटेगावाला साहित्य संमेलन व्हावे

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचे मराठी साहित्यात अतिशय मोठे स्थान आहे. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील वाटेगाव या जन्मगावी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविले जावे. या मागणीसाठी आपण साहित्य मंडळाकडे मागणी करणार आहोत. असे स्पष्टीकरण डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी बीड येथील आयोजित पत्रकार परिषदेत दिले.

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी बिंदुसरा नदीचे पुनरज्जीवन करावे

### बिंदुसरा नदी प्रदुषण व अतिक्रमण मुक्त करा मागणीसाठी बिंदुसरा नदीपात्रात लक्ष्यवेधी आंदोलन



बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील बिंदुसरा नदीचे पुनर्जीवन करावे . बिंदुसरा नदीपात्रातील अतिक्रमित बांधकाम तसेच नगरपरिषद कर्मचाऱ्यांमार्फत कचरा टाकणे तसेच जैविक कचरा यामुळे नदीचे प्रदुषण होत असुन बीडकरांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. बिंदुसरा नदीच्या प्रदूषणास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी आणि बिंदुसरा नदीचे पुनर्जीवन करावे या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१७ सोमवार रोजी सकाळी बिंदुसरा नदीवरील दगडी पुल नदीपात्रात लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांच्या मार्फत पर्यावरण मंत्री, वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितजी पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड, शेख युनुस, बीड जिल्हाध्यक्ष आप अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, सुदाम तांदळे, पांडुरंग हराळे,शेख मुबीन आदी सहभागी होते.

बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर सांडपाणी कचरा व जैविक कचरा टाकण्यात आला आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नदीचे प्रदुषण झाले आहे.त्यामुळे बीड शहरातील बिंदुसरा नदी प्रकल्पाचा आढावा घेऊन बिंदुसरा नदीपात्रातील भुमाफियांकडुन होणारे अतिक्रमित बांधकाम, बिंदुसरा नदीपात्रात मनपा कर्मचाऱ्यांमार्फत टाकला जाणारा कचरा तसेच जैविक कचरा यामुळे बीडकरांचे आरोग्य धोक्यात असुन भविष्यात १९८९ सारखी पुरस्थिती निर्माण झाल्यास मोठ्या प्रमाणावर वित्तहानी आणि जिवितहानी होऊ शकते यासाठी नगरपरिषदेने सीमारेषा आखुन फ्लड झोन,ग्रीन झोन,रेड झोन, यल्लो झोन आदी बाबत उपाययोजना करण्यात यावी. पूररेषेच्या आत असणारी अतिक्रमित बांधकाम प्रकरणी हलगर्जीपणा करणाऱ्या नगरपरिषद प्रशासनातील अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

## थोडक्यात



### वसंतदादा पाटील महाविद्यालयात फळे वाटप

पाटोदा – येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त १७ फेब्रुवारी रोजी तांबा राजुरी स्थित मूकबधिर व मतिमंद निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना फळे व बिस्कीट वाटप करण्यात आले. प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत आयोजित या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांना प्राचार्यांच्या हस्ते फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मूकबधिर व मतिमंद निवासी शाळेतील मुख्याध्यापक खोसे सर, डॉ. तांबे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर संचालक डॉ. गणेश पाचकोरे, प्रसिद्धी विभागप्रमुख डॉ. मनोजकुमार प्रकाश, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, कर्मचारी कल्याण समिती सचिव डॉ. शरद पवार उपस्थित होते.

### बेबीकिटचे वाटप

पाटोदा: येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे



सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त १७ फेब्रुवारी रोजी पाटोदा ग्रामीण रुग्णालयात नवमातांना बेबीकिटचे वाटप करण्यात आले.प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत आयोजित या कार्यक्रमात ग्रामीण रुग्णालयात वैशाली प्रशांत भारती व राधा श्रीहरी बेदरे या नवमातांना प्राचार्यांच्या हस्ते बेबीकिट देण्यात आले. याप्रसंगी रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पल्लवी तांदळे, डॉ. कृष्णा नागरगोजे, सिस्टर आस्मा मुजावर यांच्यासह उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर संचालक डॉ. गणेश पाचकोरे, प्रसिद्धी विभागप्रमुख डॉ. मनोजकुमार प्रकाश, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, कर्मचारी कल्याण समिती सचिव डॉ. शरद पवार उपस्थित होते.

## बालरंगभूमी परिषदेचे कार्य कौतुकास्पद-डॉ.मीना हंगे




बीड। प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटक संस्था बालरंगभूमी परिषद जिल्हा शाखा बीड च्या वतीने नृत्य,गायन, वादन, जादू चे प्रयोग यांसारखे विविध दर्जेदार उपक्रम राबवले जाते. अशा उपक्रमांमधून बालमनावर कला संस्कार रुजवण्या बरोबरच त्यांच्या आरोग्याचे ही काळजी घेण्यासाठी मोफत आरोग्य शिबिराच्या माध्यमातून बालरंगभूमी परिषदेच्या जिल्हाध्यक्षा तथा ज्येष्ठ साहित्यिका प्राचार्या डॉ.दीपा ताई क्षीरसागर यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन महात्मा गांधी रुग्णालयाच्या इन्चार्ज डॉ.मीना हांगे यांनी व्यक्त केले.

दिनांक १५ फेब्रुवारी रोजी येथील सौ.के.एस.के महाविद्यालयात बालरंग भूमी परिषदेच्या सदस्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन बालरंग भूमी परिषदेचे कार्यवाह डॉ. संजय पाटील देवळाणकर डॉ.अरुण भस्मे,प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर सह कार्यवाह सौ.कांचन चिंचोलकर यांचे हस्ते करण्यात आले.यावेळी शिबिरात डॉ.अनिल राठोड डॉ. अहिल्या गायकवाड ,डॉ.प्राची जाजू,डॉ.वृषाली बनसोडे डॉ.तन्मय लिंगायत, डॉ.पूजा काळे, डॉ.सिमरन मुंजेवार, डॉ.दीपिका आंधळे,डॉ.मारिया सय्यद, डॉ. रसिका ठाकरे, डॉ.आकाश ढेरंगे, यांनी बालरंग भूमी सदस्यांच्या आरोग्याची तपासणी करून औषधोपचार केले. या आरोग्य तपासणी शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला.

## कारंजा टॉवर जवळ सिमेंटचे चार बाकडे ठेवले

### आबालवृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला!

बीड। प्रतिनिधी

शहरातील ऐतिहासिक कारंजा टॉवर ची होत असलेली परवड व दुर्दशा आणि वयोवृद्धांची होत असलेली ससेहोलपट बघून त्यात तक्रार निवारण केंद्र सुरू करण्यात यावे तसेच तीन बाजूने वयोवृद्धांसाठी वट्टे बांधावे किंवा सिमेंटचे बाकडे ठेवावे अशी मागणी नुकतीच दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनातून मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी केली होती. ही बातमी प्रसिद्धी माध्यमातून प्रकाशित झाल्यानंतर कारंजा टॉवर जवळ सिमेंटचे चार बाकडे ठेवण्यात आले असून या बाकड्यांमुळे आता ज्येष्ठ वयोवृद्ध नागरिकांची सोय झाली असून येथे बाकडे ठेवता क्षणी वयोवृद्ध येऊन बसत आनंद घेत आहेत. कारंजा टॉवरला परिपूर्ण करून शासन-प्रशासनाने हा आनंद द्विगुणीत करावा. असे ज्येष्ठ वयोवृद्ध नागरिक बोलत आहेत.

गेल्या दहा वर्षांपासून ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या तीन बाजूचे वट्टे जमीनदोस्त झाल्याने आबाल वृद्धांना बसण्यासाठी जागा राहिली नव्हती.



यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक कारंजा टॉवर समोर असलेल्या एका कापड दुकानाच्या पायऱ्यांवर बसत होते. दुपारनंतर येणारे सायं. दैनिके त्याच पायऱ्यांवर बसून वाचत होते. वयोवृद्धांचा हा नित्यक्रम पाहून कारंजा टॉवरच्या सभोवती पूर्वीसारखे वट्टे बांधणे किंवा सिमेंट बाकडे ठेवणे आवश्यक असल्याचे लक्षात आल्याने एस.एम.युसूफ़ आणि रमेशराव गंगाधरे यांनी याविषयी निवेदन दिले होते.

याविषयीचे वृत्त दिनांक १५ व १६ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रसिद्धी माध्यमातून प्रकाशित झाल्यानंतर दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ रविवार रोजी येथे सिमेंटचे चार बाकडे ठेवण्यात आले आहे. यामुळे आबालवृद्धांची सोय झाली आहे. आता येथे विनापरवाना अनधिकृतपणे लावण्यात येणारे डिजिटल बॅनर लावण्यास बंदी घालावी. त्याची अंमलबजावणी करावी. इमारतीच्या चारही बाजूंनी लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करावे. कचरा आणून टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी तसेच टॉवरच्या दक्षिण बाजूस जसे बाकडे ठेवण्यात आले तसेच पश्चिम व उत्तर बाजूस सुद्धा ठेवण्यात यावे. बंद करून ठेवलेले कारंजा टॉवर उघडून त्यात तक्रार निवारण केंद्र सुरू करावे. कारंजा टॉवरच्या इमारती समोर लावण्यात आलेले पाण्याचे कारंजे सुद्धा सुरू करणे आवश्यक आहे. शासन-प्रशासनाकडून कारंजा टॉवरला गत वैभव पुन्हा प्राप्त करून दिले जात नाही तोपर्यंत याविषयी लढा सुरूच राहील असे एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी म्हटले आहे.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना स्थानिक ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बीड मार्फत दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण पॉलीटेकनिक कॉलेज बार्शी रोड बीड येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदर मेळाव्यामध्ये पुढिलप्रमाणे नामांकित कंपनीच्या वतीने बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी याकरिता मुलाखती घेण्यात येणार आहेत.

ब्रिजयोग टोयोटा बीड येथे सुपरवायजर/सेल्स रिप्रेजेंटेटिव्ह एकूण पदे १०, शैक्षणिक पात्रता १२ वी/ पदवी, वयोमर्यादा-१८ ते ३०. एस. जी. सॉफ्टवेअर सोल्युशन बीड येथे मार्केट डेव्हलपमेंट इक्झिक्युटिव्ह एकूण पदे १०, शैक्षणिक पात्रता- १२ वी/पदवी, (वयोमर्यादा-१८ ते २४). बजाज अॅटो लि. संभाजीनगर येथे डि.टी.ई. एकूण पदे ५०, शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरींग/पदवी, वयोमर्यादा-१८ ते २४. पर्किन्स इंडिया लि संभाजीनगर येथे डि.टी.ई. एकूण पदे ५०, शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरींग/ पदवी, वयोमर्यादा-१८ ते २४. डायनॅमिक कन्सलटन्सी पुणे येथे सेल्स रिप्रेजेंटेटिव्ह/क्यॉलिटी इंजिनिअर एकूण पदे ४०, शैक्षणिक पात्रता डिप्लोमा इन सव्हिल इंजिनिअरींग/१० वी/१२ वी/ पदवी/एम.बी.ए वयोमर्यादा-१८ ते २४. कोलब्रो ग्रुप नागपूर सर्वेअर एकूण पदे ३०, शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन सव्हिल इंजिनिअरींग पदवी, वयोमर्यादा-१८ ते २४. क्रेडिट अॅक्सेस केंद्र मॅनेजर एकूण पदे ५०, शैक्षणिक पात्रता- १२ वी / पदवी, वयोमर्यादा-१८ ते २९. गोंविदाज एच. आर. नाशिक ट्रेनी एकूण पदे ५०, शैक्षणिक पात्रता १२ वी/ पदवी, वयोमर्यादा-१८ ते ३०. जॉन डेअर लि पुणे ट्रेनी इंजिनिअर एकूण पदे ५०, शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरींग, वयोमर्यादा-१८ ते २२. ब्रम्ह प्रिसिशिअन मटेरिअल संभाजी नगर येथे क्वॉलिटी इंजिनिअर एकूण पदे १५, शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरींग, वयोमर्यादा-१८ ते २२ रोजगार मेळाव्यात सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांनी पुढीलप्रमाणे सहभागी व्हावे.

सर्वप्रथम नोकरी इच्छुक उमेदवारांनी नोंदणी करुन आपल्या युजरनेम व पासवर्डचा वापर करुन बटनावर क्लिक करावे. प्रोफाईल मधील प व पंडित दीनदयाळ उपाध्याय, रोजगार मेळावा-०३ या लिंक वर क्लिक करुन रोजगार मेळाव्याचा बीड जिल्हा निवडून बटनावर क्लिक करावे. आपल्याला बीड- पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा-०३ दिसु लागेल. त्यातील या पर्यायाखालील दोन बटना पैकी पहिल्या बटनावर क्लिक केल्यास मेळाव्याची माहिती दिसेल. आपला रोजगार मेळाव्यामध्ये ऑनलाईन सहभाग नोंदवला जाईल. याबाबत बीड जिल्हयातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी .... या संकेतस्थळावर ऑनलाईन अप्लाय करावे व त्याच बरोबर दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण पॉलीटेकनिक कॉलेज बार्शी रोड बीड येथे प्रत्यक्ष मुलाखतीस येऊन संधीचा लाभ घ्यावा. रोजगार मेळाव्यास येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावी. या बाबत काही अडचणी असल्यास या कार्यालयाचा दुरध्वनी कं.०२४४२-२९९११६ आणि श्री. इंगोले यांना ९८२२७८१८७६ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा तसेच या फेसबुक पेजला फॉलो व लाईक करावे असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुशिल उचले, यांनी केले आहे.

## राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना व क्रीडा क्षेत्रात व्यक्तींना पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारा राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यासाठीचे गुणांकन प्रसिद्ध करण्यात आले असून यावर हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणार्या ज्येष्ठ क्रीडा महर्षिकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांकरीता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) व जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

शासनाने दि. २९ डिसेंबर, २०२३ व दि.२५ जानेवारी २०२४ अन्वये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावली, २०२३ विहीत केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२३-२४ या वर्षाच्या पुरस्कारासाठी राज्यातील क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू व साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू/व्यक्ती यांच्याद्वारा दि. १४ जानेवारी ते २६ जानेवारी, २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या अर्जाची प्राथमिक छाननी करण्यात आलेली असून, प्राथमिक छाननीचे गुणांकन तक्ते शासन निर्णय क्र. शिछपु. २०२३/ प्र.क्र.१८८/क्रीयुसे-२ दि. २९डिसेंबर, २०२३ मधील नियम क्र.१.१९, नियम क्र.१.२०, नियम क्र.१.२१ अन्वये एकूण गुणांकनासह दि.१५ ते १८ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीसाठी सूचना व हरकतींसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

## नवगण महाविद्यालयात विविध कार्यक्रम

परळी। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये आज दिनांक १७ फेब्रुवारी बीड नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष डॉ भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे भरगच्च आयोजन करण्यात आले.

प्राचार्य डॉ मधुकर आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय ग्रामीण रुग्णालयामध्ये रुग्णांना फळ वाटप करण्यात आले यावेळी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ गुट्टे यांची उपस्थिती होती तसेच विद्यार्थी व प्राध्यापकांनी रुग्णांची विचारपूस करून त्यांना फळ वाटप केले. महाविद्यालयामध्ये




इतिहास विभागाच्या वतीने प्रा झांजे प्रा मुळे यांच्या उपस्थितीमध्ये प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली तसेच संगीत विभागाच्या वतीने प्रा जोशी मॅडम व विभाग प्रमुख डॉ दाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भावगीत गायन सुगम गायन कार्यक्रम घेण्यात आला कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली यासाठी डॉ कुरुडे डॉ घोलप प्रा जोशी मॅडम इत्यादींनी परिश्रम घेतले तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कार्यक्रमाधिकारी प्रा बबन मोहिते, उपप्राचार्य डॉ लालासाहेब घुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला. हिंदी विभागाच्या वतीने प्रा गिरे प्रा पवार प्रा राठोड यांच्या पुढाकाराने ऑनलाईन वेबिनार घेण्यात आला. यावेळी अनेक प्राध्यापकांनी झूम मीटिंग द्वारे विचार मंथन व चिंतन केले. राज्यशास्त्र विभागाच्या वतीने प्रा सिरसाट यांनी सामान्य ज्ञान वाचन स्पर्धा घेतली तसेच गृहशास्त्र विभाग व विज्ञान विभागाच्या वतीने ऑनलाईन प्रश्नमंजुषा घेण्यात आली डॉ भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयातीलविविध विभागाने विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करून सचिव साहेब यांना शुभेच्छा व्यक्त केल्या.

# लाभार्थ्यांचे डीबीटी व केवायसी ठसे उमटत नसल्यामुळे बँकेत अनुदान जमा नाही

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्रावणबाळ,संजय गांधी निराधार योजना डी. बी. टी. सक्तीचे केले ही गोष्ट चांगली पण वृध्दांचे ठसे उमटत नसल्यास त्यांना अनुदान देण्यासंबंधीचे निवेदन उपजिल्हाधिकाऱ्यांना मानवलोकच्या वतीने देण्यात आले.

त्यात नमुद केले आहे की,अंबाजोगाई तालुक्यात तीस हजारापेक्षा जास्त निराधार राष्ट्रीयकृत बँकेतून अनुदान उचलतात. चार महिन्यापुर्वी लाभार्थ्यांना त्यांच्या खात्यावर अनुदान जमा झाले. परंतू जानेवारी महिन्यात एक महिन्याचे अनुदान आर्ध्या लाभार्थ्यांना मिळाले मात्र उर्वरीत लाभार्थीना डी. बी. टी. सक्तीचे केल्यामुळे बँकेतून अनुदान मिळाले नाही. बँकेशी व तहसील कार्यलयाशी संपर्क केला असता, तहसील कार्यालयातून डि.बी.टी.



## उपाययोजना करण्याची मानवलोकची निवेदनाव्दारे मागणी

व केवायसी फॉर्म भरा तरच तुम्हाला अनुदान पडेल अन्यथा पडणार नाही असे सांगण्यात आले.

लाभार्थी बँकेत गेले असता त्यांचे अंगठ्यांचे ठसे व्यवस्थित उमटले जात नाहीत कारण त्यांच्या आंगठ्यावरील रेषा नाहीशा झालेल्या आहेत. तसेच काही जणांच्या हाताला बोटे नसल्यामुळे व डोळे निकामी झाल्यामुळे केवायसी फॉर्म अपडेट होत नाही. त्यामुळे त्यांच्या खात्यावर अनुदान पडले नाही. अशा लाभार्थ्यांसाठी शासनाने वेगळा निर्णय घेवून आहे त्या बँकेत अनुदान देण्याची व्यवस्था करावी. कारण आज घडीला बँकेत अनुदान न पडल्यामुळे वृध्द निराधार अनुदान बंद झाले की काय? या अनुदानावरच वृध्दांची उपजीवीका, औषध उपचार अवलंबून आहेत.

तसे पाहीले तर डी. बी.टी. ही संकल्पना चांगली आहे परंतू काही लाभार्थ्यांना डी.बी.टी. व केवायसी ठसे उमटत नसल्यामुळे बँकेत अनुदान येत नाही. त्यामुळे आहे त्या बँकेत त्यांचे अनुदान ताबडतोब पाठवून त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार नाही याची दखल आपल्या कार्यालयाने घ्यावी असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. त्यावर मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया, शाम सरवदे, संजना आपेट, सावित्री सागरे यांच्यासह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# निराधारांच्या बंद पडलेल्या पगारी सुरु करण्यात याव्यात




## सय्यद सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको

**माजलगाव । प्रतिनिधी**

निराधारांच्या बंद पडलेल्या पगारी तात्काळ सुरू करण्यात याव्या त्यांना तीन हजार रुपये मानधन देण्यात यावे व डीडीसीची जाचक अट तात्काळ रद्द करण्यात यावी यासह विविध मागन्यासाठी सय्यद सलीमबापू (मराठवाडा अध्यक्ष) यांनी आंबेडकरी विचार मोर्चा व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा संघटनेमार्फत माजलगाव तहसील कार्यालया समोर सोमवार दि.१७ फेब्रुवारी रोजी रास्ता रोको आंदोलन सुरू केले.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी तहसिल कार्यालय माजलगाव येथील कर्मचारी हे जाणीवपुर्वक संजय गांधी,इंदीरा गांधी,श्रावणबाळ, अर्थसहाय्यता या निराधार लोकांची अडवणुक करीत असल्याचा आरोप केला.निराधारांच्या पगारी वेळेवर वाटप करीत नाहीत.तसेच त्यांना सांगण्यात येते की,तुम्ही आधार लिंक करा,परंतु काही लोकांचे अंगठे येत नाहीत त्याचे काय?असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांना केला. निराधारमध्ये अनेक अंधळे, लंगडे, बहिरे,मुके,कुष्ट रोगी,कॅन्सर पेशन्ट, वयस्कर,विधवा इत्यादी लोकांची आपल्या कार्यालयामार्फत वेठीस धरल्या जात आहे.त्यामुळे निराधारांची हेळसांड होत आहे. कर्मचारी त्यांना अपमानास्पद वागणुक देत आहेत.तसेच त्यांची हयातनाम्याच्या नावाखाली अनेक पगारी बंद करण्यात आलेल्या आहेत.पगारी अडवुन ठेवण्यात आलेल्या आहेत.त्यामुळे वरील लोकांना आर्थिक त्रास होत आहे. तसेच दवाखान्याचा इलाज होत नाही.त्यांना खाण्या-पिण्यासाठी अन्न भेटत नाही.त्यामुळे त्यांना जिवन नकोसे झालेले आहे.तसेच आपल्याकडे निराधाराला मंजुर झालेल्या पगारीबाबत मुळ संचिका आहे का?तसेच निराधारांच्या पाच वर्षाच्या पान ३ वर

# पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात इयत्ता दहावी वर्गाचा शुभेच्छा समारंभ

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या इ.१०वी वर्गाचा शुभेच्छा समारंभ दि.१७ फेब्रुवारी २०२५ सोमवार रोजी उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून १०वी प्रमुख विष्णू तेलंगे उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर आणि देवी



सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी विद्यार्थी मनोगतात इ.१०वीतील कु.सुप्रिया साळवे,अक्षता थोरात,अक्षता साळुंके,प्रिया वाघमारे,प्रीती सोळंके,निशिगंधा निकम,चि. विश्वजित निकम,सलमान शेख,साजिद शेख,गजानन पांचाळ,प्रणव वाघमारे,ओमकार कल्याणी यांनी विद्यार्थी जीवनातील एक टप्पा पूर्ण केल्याचा आनंद आणि या काळातील पान ३ वर

# वारकरी संप्रदायातील मधुकर खाडे हे निष्काम कर्मयोगी होते -ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे

## होळ येथे वै.पै.मधुकर महाराज खाडे यांच्या स्मरणार्थ किर्तन

केज । प्रतिनिधी

जो कोणत्याही फळाची किंवा परिणामांची अपेक्षा न करता, निःस्वार्थ, इच्छाशून्यपणे कर्तव्य करतो, त्याला निष्काम कर्मयोगी म्हणतात. वारकरी संप्रदायातील मधुकर महाराज खाडे हे निष्काम कर्मयोगीच होते, असे प्रतिपादन होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे कोद्रीकर यांनी व्यक्त केले.

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. गंगापुजनानिमित्त केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह होत आहे. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव असलेले ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे हे रविवारी (दि.१६) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. अर्जुन महाराज लटपटे यांनी संत तुकाराम महाराज यांचा 'इहलोकींचा हा देह । देव इच्छिताती पाहे ।।१।। धन्य आम्ही जन्मा आलो । दास विठोबाचे झालो ।।ध्रु. आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे ।।२।। तुका म्हणे पावठणे । करू स्वर्गाची निशाणी ।।३।।' हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता. महाराज म्हणाले, होळ




पंचक्रोशीतील दिवंगत व्यक्तींमध्ये आवर्जून नाव घ्यावे, अशा मंडळींमध्ये मधुकर महाराज खाडे यांचा नामोल्लेख होईल. त्यांनी कुस्ती, वारकरी संप्रदाय, राजकारण या क्षेत्रात पूर्ण ताकदीने झोकून दिले. जन्माला आलेला देह पान ३ वर

# छत्रपती शिवाजी विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले.या संमेलनाच्या उद्घाटन सत्र कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरनाथ खुर्पे तर उद्घाटक प्रा. गजानन सानप होते.यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. भगवानसिंग बैनाडे, गंगापूरच्या माजी नगराध्यक्षा सुवर्णा जाधव,नरहरी शिवपुरे,मनोज शेवाळे,मेघाताई नेमाने,मंदाताई जाधव,प्रा.डॉ. प्रदीप लगड,डॉ . योगिता होके पाटील,विलासराव लांडगे,अशोक कचरे,आदर्श



मस्के, दिपाली आवाड यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना उद्घाटक प्रा. गजानन सानप म्हणाले की, विद्यार्थ्यांनी चांगले पुस्तके वाचावीत .मोठ्या व्यक्तींशी संवाद साधावा, स्वतःला एक्सप्लोअर करा, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. अध्यक्षीय समारोपात अमरनाथ खुर्पे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी ज्या ठिकाणी संधी मिळेल तेथे व्यक्त व्हावे.यावेळी सुवर्णा जाधव, नरहरी शिवपुरे यांची समायोचित भाषणे झाली. व्यासपीठावरील पाहुण्यांचा परिचय डॉ.योगिता होके पाटील यांनी करून दिला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मनोज सोळंके यांनी केले. सूत्रसंचालन बालासाहेब झोडगे यांनी केले.या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी विद्यालयाचे माजी विद्यार्थी चैतन्य नरसाळे व ओमप्रकाश दराडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अशोक होके पाटील, इनायतखान पठाण,सीमा होके,नारायण होके यांच्यासह पालकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. या कार्यक्रमाच्या पान ३ वर

# श्री गणेश विद्या मंदिर शाळेमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ

अंमळनेर । प्रतिनिधी

अंमळनेर(भां) येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदिर शाळेमध्ये एसएससी परीक्षा फेब्रुवारी/मार्च-२०२५ ला प्रविष्ट होणाऱ्या इ. दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक आर एम हाके होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापक व सर्व सेवकांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील व रयतमाऊली सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील



यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.त्यानंतर इ.१० वीच्या विद्यार्थिनींनी सुंदर स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले.नंतर विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हस्ते शाळेच्या सर्व शिक्षक-शिक्षकेतर सेवकांचा गुलाब पुष्प व पेन देऊन सत्कार करण्यात आला.यानंतर इ.१०वी तील कु.संस्कृती लटपटे, कु.साक्षी पोकळे, कु.साक्षी आढाव,कु.ज्ञानेश्वरी सारगुडे, कु.प्रतिक्षा आहेर, कु.सोनाली खेंगरे, कु. प्रगती पोकळे, कु.वैष्णवी कांबळे, पवन पुलावळे या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शाळेविषयी, शाळेतील विविध उपक्रमांविषयी तसेच शिक्षकांविषयी आपापली मनोगते व्यक्त केली.आपल्या मनोगतांमधून विद्यार्थ्यांनी शाळेतील जुन्या आठवणी, विविधस्पर्धा, कार्यक्रम,शैक्षणिक सहल, क्षेत्रभेट, विविध स्पर्धा परीक्षा पान ३ वर

# शंभर कुटूंबांना जीवनावश्यक वस्तुंचे वितरण; मानवलोकचा पुढाकार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जनसहयोगच्या वतीने लोकसहभागातून शंभर वयोवृद्ध कुटुंबांना जीवनावश्यक वस्तुचे शनिवारी १५ फेब्रुवारी रोजी दुपारी वितरण करण्यात आले. यावेळी डॉ.सिध्देश्वर बिराजदार,डॉ.सुनिता बिराजदार, कल्पना लोहिया, भागवत कांबळे, अरुण आसरडोहकर आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.बिराजदार म्हणाले की,डॉ. व्दारकादासजी लोहिया असताना धान्य वितरणावेळी होतो तेव्हा



त्यांनी म्हटले होते की, तीस,पस्तीस जणांना किराणा वितरण होत आहे, परंतु पुढील काळात मी असेन नसेन शंभर पर्यंत लोकांना धान्य किराणा वितरण होईल त्यावेळी बाबुजी बोलले ते आज सत्य रुपात आले त्यामुळे मी समाधानी आहे. माझ्या कडून या उपक्रमासाठी अर्थसहाय्य राहील असे सांगितले.

कल्पना लोहिया म्हणाल्या की, ज्यांना पान ३ वर

# महाशिवरात्री व संताजी महाराज पुण्यतिथी निमित्त शिव महापुराण कथा व कीर्तन महोत्सव

पाटोदा । प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे यंदाही महाशिवरात्री व संत संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी सोहळा निमित्त शहराचे ग्रामदैवत भामेश्वर मंदिर येथे शिव महापुराण कथा व कीर्तन महोत्सवाचे आयोजन गुरुवार २० फेब्रुवारी ते शुक्रवार २८ फेब्रुवारी पर्यंत करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील कथाकार संगीताताई पूर्णे ह्या शिव महापुराण कथेचे निरूपण करणार आहेत दररोज सायंकाळी ८ ते १० या



वेळेत ही कथा भामेश्वर मंदिर येथे होईल. तसेच दिनांक २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री दिवशी मीराबाई आईसाहेब संस्थानच्या मठाधिपती राधाताई महाराज यांचे रात्री ९ ते ११ कीर्तन होईल व दिनांक २७ फेब्रुवारी रात्री ८ ते १० या वेळेत ह.भ.प. संगीताताई पुर्णे यांचे कीर्तन होणार आहे शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ११ छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून श्री. शंभू महादेव व श्री संत पान ३ वर

# आज फकीरजवळा येथे पहिली बौद्ध धम्म परिषद -डॉ.संजय नाकलगावकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील जवळा फकीर येथे १८ फेब्रुवारी २०२५ रोजी पहिली अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली असून या धम्म परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ संजय नाकलगावकर यांनी केले आहे.

या धम्म परिषदेचे उद्घाटन १८ फेब्रुवारी रोजी मृगदायवन महाविहार, जवळा फकीर येथे डॉ. भदंत प्राचार्य खेमधम्मो महाथेरो, मुळावा यांच्या हस्ते होणार आहे. तर धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय भिक्खू संघाचे



कार्याध्यक्ष डॉ. भदंत उपगुप्त महाथेरो, पूर्णा हे असणार आहेत. सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर महाबोधी वंदना होईल. तर सकाळी ११ ते १२:३० यादरम्यान भिक्खू संघास भोजनदान आणि त्यानंतर दुपारी १ वाजता धम्मदेसनेस सुरुवात होणार आहे. धम्म परिषदेस डॉ. प्रा. सत्यपाल महाथेरो, डॉ. भदंत इंदवंस महाथेरो, विपस्सनाचार्य भदन्त पय्यारत्न थेरो, भदन्त पय्याबोधी थेरो, भदन्त मुदितानंद थेरो, भदन्त ज्ञानरक्षित थेरो, भदन्त महाविरो थेरो, भदन्त पय्यानंद थेरो, भदन्त पय्याशील थेरो, भिक्खू धम्माल थेरो, भिक्खू रेवतबोधी, भिक्खू पय्यावर्धन, भिक्खू संघरत्न, भदन्त धम्मघोष यांची धम्मदेसना होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून आ. प्रकाश दादा सोळंके, बहुजन विकास पान ३ वर

# भविष्याचा वेध घेत विद्यार्थ्यांनी मार्गक्रमण करावे - डॉ. बी. धीरजकुमार

माजलगाव । प्रतिनिधी

भविष्याचा वेध घेत विद्यार्थ्यांनी मार्गक्रमण करावे असे प्रतिपादन माजलगावचे उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ. बी.धीरजकुमार यांनी केले.श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजी विद्यार्थी विभाग व मूल्यमापन विभाग यांच्या वतीने आयोजित पदवीप्रदान समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.




अध्यक्षस्थानी स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी तसेच मंचावर केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड,अमरनाथ खुर्पे,महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी माजी विद्यार्थी विभाग प्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा, मूल्यमापन विभाग प्रमुख डॉ.सिताराम इंगोले यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात २०० पेक्षा अधिक पदवीधर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत प्रभात फेरी काढून करण्यात आली.पुढे बोलताना उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ.बी.धीरजकुमार म्हणाले की, सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे.या युगामध्ये टिकावयाचे असेल तर भविष्याची दिशा आता आपण ठरवणे आवश्यक आहे.कारण आपण पदवीधर शिक्षण घेऊन समाजाच्या प्रवाहात बाहेर पडला आहात यात जर सक्षमपणे आपल्याला उभारायचे असेल तर भविष्याची दिशा ठरवणे हे अत्यंत महत्त्वाचे पान ३ वर

# डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसा-निमित्त रामतीर्थ शाळेत विविध स्पर्धा संपन्न

बीड । प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्था संचलित रामतीर्थ प्राथमिक शाळा व हायस्कूल औद्योगिक वसाहत बीड येथे संस्थेचे सचिव तथा माजी नगराध्यक्ष भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते .



डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त रामतीर्थ प्राथमिक शाळा व हायस्कूलमध्ये निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, चित्रकला स्पर्धा ,हस्ताक्षर स्पर्धा ,सामान्य ज्ञान स्पर्धा ,कथाकथन स्पर्धा आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते .दिनांक १७ फेब्रुवारी रोजी शाळेतील सर्व विजेत्या स्पर्धकांना तसेच उपविजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक परदेशी सर, बरकसे सर तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# जुन्या न्यायालयाच्या इमारतीचा विकास आराखडा तयार करा -अजित पवार

**जुन्नर । प्रतिनिधी**

जुन्नर येथील जुन्या न्यायालयाची इमारत सन १८३८ या सालाची असून विविध राजवटीचे कामकाज परिसरातील भुईकोट किल्ला, गढी येथून चालत होते; या ऐतिहासिक वास्तूचा पुनर्विकासाबाबतच्या विविध मागण्या विचारात घेवून न्यायालय, पुरातत्व विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, वकील संघटना तसेच आदींनी मिळून विकास आराखडा तयार करा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.




पवार म्हणाले, आपल्या देशात, राज्यात न्यायव्यवस्थेवर जनतेचा मोठा विश्वास आहे. लोकशाहीच्या रक्षणामध्ये न्यायालयांच खूप मोठे योगदान आहे. त्यामुळे राज्यात आवश्यक येथे न्यायालयीन इमारती उभ्या करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. जुन्नर येथील न्यायालयीन इमारत परिसर विकास आणि निवासस्थानाबाबत कार्यवाही करण्यात येत असून याकरीता आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला जाईल. आगामी काळात जुन्नरवासियांना अभिमान वाटेल असाप्रकारचा परिसर विकसित करण्यात येईल.

न्यायालयीन वास्तू दिमाखदार तसेच सर्व सुविधांनीयुक्त असल्या पाहिजेत आणि त्यामधून नागरिकाला न्याय मिळाला पाहिजे, याकरीता जिल्ह्यात टप्प्याने न्यायालयीन इमारतीचा विकास करण्यात येत आहे. जुन्नर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या इमारतीचे आज उद्घाटन करण्यात आले असून आज जुन्नरवासियांच्या न्यायिक इतिहासात आजचा दिवस एक आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. या न्यायालयामुळे पक्षकरांना खेड-राजगुरुनगर येथे जाण्या-येण्याची वेळ तसेच इंधनाची बचत होणार असून परिणामी त्रासही कमी होणार आहे.

न्यायालयाच्या माध्यमातून गुन्हेगारी खटले, दिवाणी आणि फौजदारी खटले निकाली काढण्यास निकाली काढण्यास मदत होणार आहे. परिसरातील नवोदित वकिलांना सेवा देण्याची संधी उपलब्ध होण्यासोबतच त्यांच्या व्यवसायात वाढ होईल. शिवाजीनगर येथील वकिलांच्या मागणीबाबत सकारात्मक विचार इमारतीला साजेसे असे स्वच्छतागृह आणि परिसराचा विकास करण्यात येईल. मुंबई येथे उच्च न्यायालयासाठी नवीन इमारत बांधण्यासाठी बीकेसी येथे जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे, देशातील उत्तम वास्तूविशारदाकडून उत्कृष्ट आराखडा उपलब्ध करून देण्यात यावा. देशातील सर्वात चांगली उच्च न्यायालयाची इमारत मुंबई येथे उभारु, अशा विश्वास पवार यांनी व्यक्त केला.

# विवाहाचे आमिष दाखवून तरुणीची फसवणूक; तब्बल ३४ लाखांना घातला गंडा

पुणे : राज्यात फसवणूकीचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून फसवणुकीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. विवाहाच्या आमिषाने आयटी इंजिनिअर तरुणीची ३४ लाखांची फसवणूक करणाऱ्या तरुणाला बाणेर पोलिसांनी मुंबईतून अटक केली. त्याने तरुणीला तब्बल ३४ लाख रुपयांना गंडा घातला. साईश विनोद जाधव (वय २५, रा. साईबाबानगर, चेंबूर, मुंबई) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत २४ वर्षीय तरुणीने बाणेर पोलिसांत तक्रार दिली आहे.



तक्रारदार तरुणी बाणेरमध्ये एका हॉस्टेलमध्ये राहते. बालेवाडीतील हायस्ट्रीट येथील आयटी कंपनीत नोकरी करते. तिने २०२३ मध्ये मॅट्रोमेनियल साईटवर नाव नोंदणी केली होती. तेव्हा साईश जाधवची साईटवरून ओळख झाली होती. साईशने तिला विवाह करण्याबाबत बोलणी केली. नंतर मे २०२३ मध्ये तो भेटण्यासाठी बाणेर येथे आला. दोघांनी सोबत जेवणही केले. नंतर तो पुन्हा तरुणीला भेटण्यास आला. तरुणीने कुटुंबीयांबाबत विचारपूस केली. तेव्हा त्याने आई-वडिलांचे निधन झालेले असून, भाऊ दुबईत नोकरीला आहे, अशी माहिती दिली. बोलण्यावर विश्वास ठेवला. पुढे दोघांतील संवाद वाढला. साईशने तरुणीला सांगितले की, माझ्या मित्राने माझी फसणूक केली, ते पैसे न भरल्यास मला कारागृहात जावे लागेल. हे बोलतानाच त्याने लग्नही लवकर करू, असे सांगितले. मोबाइल बिघाडल्याचे सांगून तरुणीकडून महागडा मोबाइलही घेतला. तसेच वेगवेगळी कारणे सांगत पैसेही घेतले. तरुणीने वेळेवेळी त्याला १५ लाख रुपये दिले. नंतरही त्याने गेल्या दीड ते पावणेदोन वर्षात अशीच वेगवेगळी कारणे सांगत गेल्या तरुणीकडून एकूण ३३ लाख ८२ हजार रुपये घेतले. तरुणीने लग्नाबाबत विचारल्यानंतर मात्र तो टाळाटाळ करत असे. तरुणीला संशय आल्याने तरुणीने विचारपूस केली असता तिला फसवणूक झाल्याचे लक्षात आले. नंतर तिने पोलिसांकडे तक्रार दिली. बाणेर पोलिसांनी तपास करून साईशला पकडले. सहायक निरीक्षक अनिल केकाण अधिक तपास करत आहेत.

## सोसायटीतून बॅटरी चोरणाऱ्याला पोलीसांनी ठोकल्या बेड्या; ८ बॅटरी अन् रिक्षा जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. शुक्रवार पेठेतील एका सोसायटीत घुसून वाहनांच्या बॅटरी चोरणाऱ्या चोरट्याला गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्याच्याकडून चोरलेल्या आठ बॅटऱ्या आणि रिक्षा जप्त केली आहे. सूरज नामदेव साठे (वय ३२, रा. दांडेकर पूल) असे अटक केलेल्याचे नाव आहे.



काही दिवसांपूर्वी शुक्रवार पेठेतील आशीर्वाद अपार्टमेंटच्या तळमजल्यावरून बॅटऱ्या चोरीला गेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी खडक पोलिसांत गुन्हा नोंदवला आहे. तांत्रिक तपासात चोरटा रिक्षातून बॅटरी घेऊन पसार झाल्याची माहिती मिळाली होती. पोलिसांनी रिक्षाचालकाचा शोध घेण्यास सुरुवात केली. गुन्ह्यात वापरलेली रिक्षा सिंहगड रस्ता येथे असल्याची माहिती पोलीस कर्मचारी दत्ता सोनवणे यांना मिळाली. नंतर सापळा लावून साठेला ताब्यात घेतले. चौकशीत सूरज साठे याने पत्नी, तसेच महिलेच्या मदतीने सोसायटीच्या आवारातून बॅटरी चोरून नेल्याची समोर आले. पोलिसांनी त्याच्याकडून ८ बॅटऱ्या आणि रिक्षा जप्त केली आहे. गुन्हे शाखेच्या युनिट एकचे पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली आहे.

# प्रत्येकाच्या मनात स्वराज्याविषयी आपुलकी निर्माण केली : बानगुडे पाटील

**पिंपरी । प्रतिनिधी**

शेतकर्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावायचा नाही मग ते कोणत्याही प्रांतातील असो, स्त्रीयांचा सन्मान करा, परस्त्री मातेसमान असते अशी अनेक मुल्ये महाराजांनी पुढच्या पिढीला दिली. जगातील पहिला सर्जिकल स्ट्राईक महाराजांनी पुण्याच्या लाल महालात केला. त्यांनी त्यांच्या आयुष्यात बजावलेल्या कामगिरीची बरोबरी कोणीच करू शकत नाही.



प्रत्येकाला न्याय मिळेल असे स्वराज्य स्थापन करून प्रत्येकाच्या मनात स्वराज्याविषयी आपुलकी निर्माण करण्याचे काम त्यांनी केले, असे प्रतिपादन शिवव्याख्याते नितीन बानुगडे पाटील यांनी केले.'असे होते छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर व्याख्यान सादर केले. यावेळी ते बोलत होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२५ चे आयोजन निगडी येथील शक्ती-शक्ती चौक, अ प्रभाग जवळील नियोजित महापौर निवास मैदान, चिंचवड येथील छत्रपती संभाजीनगर, डांगे चौक,थेरगाव तसेच पिंपरी येथील एच. ए. कॉलनी या ठिकाणी १५ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत करण्यात आले आहे. या प्रबोधन पर्वाचे उद्घाटन निगडी येथील भक्ती शक्ती येथे झाले. यावेळी अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी माजी नगरसेवक सचिन चिखले, मारूती भापकर, उप आयुक्त अण्णा बोदडे, मुख्य आपत्ती व व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता राजेद्र शिंदे, नितिन देशमुख, बापूसाहेब गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,कनिष्ठ अभियंता चंद्रकांत कुंभार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस मराठी वाहिनीवरील लोकप्रिय शाहीर रामानंद उगले यांनी शाहिरीतून शिवदर्शन या कार्यक्रमादरम्यान छत्रपती शिवाजी महाराज यांचे तेजस्वी विचार तसेच प्रेरणादायी जीवनावर आधारित पोवाड्यांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांना वडील आप्पासाहेब उगले यांनीही साथ देत आपली शाहिरी सादर केली.

## धामणी ग्रामस्थांच्या वतीने खासदार डॉ. कोल्हेंना निवेदन

आंबेगाव : धामणी (ता. आंबेगाव) येथील ग्रामस्थांच्यावतीने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन



इमारतीच्या संरक्षक भिंतीसाठी निधी द्यावा, इतर काही विकासकामांच्याबाबत निधींची तरतूद होण्यासाठी प्रयत्न करावे, आदी मागण्यांचे निवेदन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना दिल्याची माहिती सरपंच रेश्मा बोऱ्हाडे यांनी दिली.

रविवारी सायंकाळी लोणी येथे खासदार डॉ. अमोल कोल्हे कार्यक्रमाच्या निमित्ताने आले होते. त्यांच्या समवेत भीमाशंकर साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष देवदत्त निकम हे होते. यावेळी सरपंच रेश्मा बोऱ्हाडे, उपसरपंच अक्षय विधाटे, माजी उपसरपंच नीलेश रोडे, ग्रामपंचायत सदस्य प्रतीक जाधव, भाऊसाहेब करंडे, कैलास रोडे, अविनाश बढेकर, शांताराम रोडे, अक्षय रोडे, चेतन रोडे, विकास रोडे, सागर रोडे, दत्ता रोडे आदी उपस्थित होते.

धामणी गावातील भैरवनाथ मंदिराच्या तटबंदीच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत व भैरवनाथ मंदिर शेजारी शेजारी असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची संरक्षण भिंत व मंदिराच्या तटबंदीच्या कामासाठी एकत्रित निधी उपलब्ध करावा, असे सरपंच रेश्मा बोऱ्हाडे यांनी यावेळी मागणी केली.

# कामगारांचे आरोग्य जपणेही तितकेच महत्त्वाचे -अंकुश आसबे

पुणे : आरोग्य उत्तम असेल तर घर ही उल्हास आणि ऊर्जेने परिपूर्ण राहतं. रियल इस्टेट सेक्टर मध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या व्यंकटेश बिल्डकॉनसाठी केवळ उत्तम घरे बांधणेच नव्हे, तर आपल्या कर्मचाऱ्यांचे आणि कामगारांचे आरोग्य जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कामाच्या ठिकाणी प्रत्येकाला सुरक्षित, आनंदमयी आणि स्वस्थ वातावरण मिळावे, यावर कंपनीचा नेहमीच भर राहिला आहे, असे मत श्री व्यंकटेश बिल्डकॉन चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अंकुश आसबे यांनी व्यक्त केले.




श्री व्यंकटेश बिल्डकॉनच्या रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केले असून यानिमित्ताने विविध कंपनीच्या वतीने वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन काण्यात आले आहे. त्या निमित्ताने व्यंकटेश एरंडवणे सेंट्रल येथे भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन माजी आमदार कुमारभाऊ गोसावी यांच्या हस्ते झाले.

यावेळी अ‍ॅड. उन्मेश देशपांडे, लहुराज आसबे, हेमंत गोसावी, शुभांगी आसबे, पीयुषा आसबे आणि अमित मोडगी उपस्थित होते. या शिबिरात अहिल्या हेल्थ हेल्पलाइन आणि सत्यशिव ग्लोबल फाउंडेशनचे डॉ. रोहित बोरकर यांच्या सहकार्याने विविध तज्ञ डॉक्टरांनी उपस्थित कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी केली.२२ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या वर्धापनदिन सोहळ्यात दररोज वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जाणार आहेत.

## सर्पदंशाने मृत्यू झालेल्या तरुणाच्या कुटुंबाला मदत

**आळंदी । प्रतिनिधी**

सर्पदंशाने मृत पावलेल्या तरुणाच्या कुटुंबाला आळंदीकर तरुणाईने एकत्र येत नव्वद हजार रुपयांची मदत केली. मदतीचा हात म्हणून शहरातील तरुणाईनी आळंदीकर ग्रामस्थांनी समाजमाध्यमावरील ग्रुपच्या माध्यमातून दिलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत रक्कम गोळा केली.

आळंदीतील बत्तीस वर्षीय सर्पमित्र राहुल ऊर्फ विकास मल्लिकार्जुन स्वामी यांचा शनिवारी (ता. ८) सर्पदंशाने मृत्यू झाला होता. राहुलच्या वडिलांचा वर्षभरापूर्वी मृत्यू झाला. कुटुंबाची जबाबदारी राहुल आणि त्याची आई सांभाळते. राहुलच आई संत ज्ञानेश्वर माउलींच्या समाधी मंदिरासमोर महाद्वारात पथारी मांडून दुकान लावत. मात्र राहुलचा मृत्यू झाल्यावर आई शकुंतला स्वामी आणि एक बहिण असाच परिवार उरला. यामुळे राहुलच्या निधनानंतर कुटुंबाला मदतीचा हात म्हणून आळंदीकर ग्रामस्थांनी त्यांना मदत करण्यासाठी आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत नव्वद हजार रुपयांची रक्कम जमा झाली. ती कुटुंबीयांकडे सुपूर्त करण्यात आली.

# कर्जत जामखेडमध्ये भरणार 'महाराष्ट्र केसरी स्पर्धा'; पुन्हा एकदा रंगणार कुस्तीचा महासंग्राम

पुणे : गेल्या ६५ वर्षांपासून महाराष्ट्र केसरी स्पर्धा भरवत असलेल्या महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेने यंदाही ही स्पर्धा अहिल्यानगरमध्ये भरवण्याचे ठरवले आहे. यानिमित्त मी महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेला ही स्पर्धा आमच्या मतदारसंघात भरवण्याची विनंती केली होती, याला मान्यता देत कुस्तीगीर परिषदेने ही स्पर्धा कर्जत जामखेडमध्ये भरवण्यास परवानगी दिली, अशी माहिती आमदार रोहित पवार यांनी दिली.



दोन-दोन महाराष्ट्र केसरी स्पर्धा होत असल्याने कुस्तीपटूंना नेमका प्रश्न पडलाय की, कोणती स्पर्धा योग्य आहे. हाच धागा पकडत आमदार रोहित पवार यांनी नुकत्याच भरवलेल्या महाराष्ट्र कुस्तीगीर संघावर जोरदार टीकास्त्र सोडत त्यांनी भरवलेली स्पर्धा बेकायशीर असल्याचे सांगितले. या स्पर्धेची सुरुवात कोणी केली, आता ज्यांचा जन्मच २ वर्षांपूर्वी झालाय त्यांना काय हक्क आहे. मी फक्त आयोजन करीत आहे या स्पर्धेचे नियोजन महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद करणार आहे. त्यामुळे कुस्तीपटूंना केवळ व्यासपीठ मिळवण्याच्या हेतूने मी या सर्व स्पर्धेत उतरलो आहे. तथा यामध्ये माझा कोणताही हस्तक्षेप राहणार नाही. या स्पर्धेचे नियोजन केवळ आणि केवळ महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे पदाधिकारी आणि पंच पाहणार आहेत.

आम्ही ही स्पर्धा कुस्तीपटूंच्या हितासाठी भरवत आहोत त्यामुळे कोणत्याही खेळाडूवर आम्ही बंदी घातली नाही. या स्पर्धेचा जन्मच खेळाडूंच्या हितासाठी झाला असल्याची माहिती, महाराष्ट्र कुस्ती परिषदेचे माजी सचिव बाळासाहेब लांडगे यांनी दिली. आम्ही ही स्पर्धा गेली अनेक वर्षे भरवत आहोत. आम्हाला महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची आम्हाला मान्यता आहे. तसेच भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यता आहे. त्यामुळे आम्ही गेली ६५ वर्षे ही स्पर्धा भरवत आहोत. आता त्यांनी खेळाडूंना या स्पर्धेत सहभागी न होण्यासाठी एक फतवा काढला आहे जो पूर्णपणे असंवैधानिक आहे.

# सगळे टायगर आमच्याकडेच, गेले ते कुत्रे-मांजरे; ऑपरेशन टायगरची वसंत मोरेंनी उडवली खिल्ली

**पुणे । प्रतिनिधी**

**सध्या राज्याच्या राजकारणात शिंदे गटाच्या 'ऑपरेशन टायगर'ची जोरदार चर्चा सुरु आहे. ठाकरे गटातील बडे नेते शिवसेनेच्या जाळयात अडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. आगामी निवडणूक तोंडावर आली असताना माजी आमदार आणि पदाधिकारी हे ठाकरेंची साथ सोडताना दिसत आहेत.**

त्यामुळे येत्या काही दिवसात जिल्ह्यात मोठ्या घडामोडी घडतील या चर्चांना उधाण आले आहे. या प्रकरणावर ठाकरे गटाचे पुण्यातील नेते वसंत मोरे यांनी जोरदार टीका केली आहे. ते म्हणाले, पुण्यात ऑपरेशन टायगर काही नाही, सगळे टायगर आमच्याकडेच आहेत. गेले ते कुत्रे-मांजर होते', असं विधान केले आहे.



पुण्यात मिशन टायगर काही नाही. सगळे टायगर आमच्याकडेच आहेत. पक्ष सोडून गेले ते कुत्रे मांजर होते. महापालिकेत नेमकं कामकाजाची पद्धत काय असते कधी कार्यकर्त्याने कुठल्या अधिकाऱ्यांशी बोलावं या सगळ्या संदर्भातली तयारी आमची सुरू आहे . विधानसभानिहाय आणि बैठका बोलावलेल्या आहेत आणि प्रत्येक कार्यकर्त्याला प्रशिक्षण देण्यात येणार आहे

पुढे म्हणाले, 'महापालिका, नगरपालिका निवडणूका एप्रिल किंवा मे महिन्यांमध्ये होण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने आम्ही प्रत्येक कार्यकर्त्याला प्रशिक्षण देण्यात येणार आहे. आम्ही निवडणूका निहाय बैठका बोलावल्या आहेत. गेल्या वेळेस आमचे १३८ उमेदवार लढले होते. त्याच जागांवरच्या तयारीचा आढावा आज आणि उद्या घेणार आहोत. महापालिकेत कामकाजाची पद्धत काय असते, कार्यकर्त्याने कधी कुठल्या अधिकाऱ्यांशी बोलावे या सगळ्या संदर्भातील आमची तयारी सुरु आहे. महाविकास आघाडी होईल की नाही हा वरिष्ठाचा निर्णय आहे. जर आघाडी झाली तरी आम्ही आमच्या तयारीने ५० टक्के जागा मागू अन्यथा आमच्या स्वबळाच्या जागा लढवण्यासाठी तयार राहू', असंही वसंत मोरे यावेळी म्हणाले.

# डिंभे खुर्द येथे माजी विद्यार्थ्यांचा २५ वर्षांनी भरला वर्ग

**आंबेगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र पुणे संचलित डिंभे खुर्द (ता. आंबेगाव) येथील शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालयाचे सन १९९८-९९ मधील इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या वतीने लेझीम वाद्य संच व सरस्वती मातेची मूर्ती विद्यालयाला भेट म्हणून देण्यात आली.




शरदचंद्रजी पवार विद्यालयातील १९९८-९९ मधील इयत्ता दहावीचे विद्यार्थी २५ वर्षांनी शाळेत एकत्र आले होते. यावेळी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे औक्षण करून फेटे बांधून वाजत गाजत विद्यालयाच्या प्रांगणात स्वागत केले. सरस्वती मातेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सुनील वळसे पाटील होते. कार्यक्रमाला मुख्याध्यापक सुनील वळसे पाटील, शिक्षक संजीव पिंगळे, माणिक हुले, ज्योत्स्ना खेडकर, रवींद्र हुले, मुख्याध्यापिका शशिकला वाघमारे, अशोक राक्षे, गोपाळ रोडे, वैशाली काळे, राजेंद्र अरगडे, तुकाराम देवडे, शरद पाबळे, राजेंद्र हुले, अनंता लोहकरे, निवेदक प्रकाश बोऱ्हाडे, महेंद्र भास्कर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षकांचे पाद्यपूजन करून फेटा बांधून, गुलाब पुष्प व श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाची प्रत देऊन सत्कार केला. माजी विद्यार्थी व शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालयातील गरजू हुशार विद्यार्थ्यांना मदत फाउंडेशनतर्फे मदत करण्याचा संकल्प सर्व माजी विद्यार्थ्यांच्या वतीने करण्यात आला.मनिषा आढळराव यांनी या कार्यक्रमाचे आभार मानले. साधना राक्षे, छाया शिंदे, अर्चना शिंदे, वंदना राक्षे, सचिन आमुंडकर, अजय राक्षे, स्वप्नील खर्डे, आदेश डाके, दत्ता कोकणे, अनिता साळवे, नंदा कानसकर, अंकुश राक्षे, दीनानाथ राक्षे, मोहिनी काळे, नाजमिन तांबोळी, जितेंद्र राक्षे, स्वाती राक्षे, साधना राक्षे आदी माजी विद्यार्थ्यांनी संयोजन केले.